१४/०२

# एक शौर्यकथा

भाग्यश्री पाटील



ई साहित्य प्रतिष्ठान

अभिमानपुर्वक सादर करीत आहे

# १४/०२एक शौर्यकथा

## लेखिका : भाग्यश्री पाटील

# १४/०२एक शौर्यकथा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# १४/०२एक शौर्यकथा


## लेखिका भाग्यश्री शिवाजीराव पाटील

असिस्टंट प्रोफेसर, ई एण्ड टी सी डिपार्टमेंट

SMSMPITR, अकलूज

मोबाईल: ९०९६८११२७१

ई-मेल: bhagayshri1271@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १४ ऑक्टोबर २०१९



©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## लेखिकेची ओळख



नमस्कार!

माझे नाव भाग्यश्री पाटील. मी व्यवसायाने एक इंजिनिअर असून अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीरिंग अँड रिसर्च मध्ये असिस्टंट प्रोफेसर या पदावर कार्यरत आहे.

लेखन आणि वाचन याची आवड मला कॉलेज मध्ये गेल्यापासून लागली. साने गुरुजी, अण्णाभाऊ साठे, शिवाजी सावंत, बाबासाहेब पुरंदरे, यांची पुस्तके वाचून वाचूनच मला लेखनाची आवड कधी लागली समजलाच नाही. भारतीय सेना ही भारताचा स्वाभिमान आहे. याच सेनेची काळजी घेणे आपले कर्तव्य आहे. याच भावनेतून निर्माण झालेले हे पुस्तक.

१५ ऑगस्ट, २६ जानेवारी हे दिवस अगदी आनंदाने आपण साजरे करतो, पण हे आपण ज्यांच्यामुळे करू शकतो, ज्यांच्यामुळे आपले हे स्वातंत्र्य सुख टिकून आहे तीच भारतीय सेना सीमेवर आपल्यासाठी प्राण हातात घेऊन लढत असते. तेव्हा त्या सेनेला, तसेच त्यांच्या परिवारांना प्रेरणा देणे, त्यांची काळजी घेणे, सामाजिक बांधिलकी जपणे हे विचार या पुस्तकामधून मांडलेले आहेत माझ्यासाठी लेखन ही गोष्ट जरी नवीन असेल तरी माझ्या पुस्तकात मांडलेल्या भावना मात्र अत्यंत प्रामाणिकपणे आणि निस्वार्थीपणे मांडलेल्या आहेत. त्या वाचकांपर्यंत नक्की पोचतील असा मला विश्वास आहे. या लेखनाचा हेतू फक्त विचारणा नवीन दिशा देणे आहे. हे लेखन सर्वाना एक नवीन दिशा देईल तसेच पुस्तकाला मिळणार प्रतिसाद माझ्यातल्या लेखिकेला अजून नवीन आणि सुंदर लेखन करण्यास प्रवृत्त करेल हीच आशा

**प्रोफेसर भाग्यश्री पाटील**

अकलूज


**संपर्क :**

भाग्यश्री शिवाजीराव पाटील
असिस्टंट प्रोफेसर, ई एण्ड टी सी डिपार्टमेंट
SMSMPITR, अकलूज
मोबाईल: ९०९६८११२७१
ई-मेल: bhagayshri1271@gmail.com

**Tip: या पुस्तकातील सर्व लेखन माझेच असून या पुस्तकाचे ले औटींग तसेच मुखपृष्ठाचे डिझाइन मी स्वतः केले आहे.**

माझे पहिले पुस्तक “अन्नदाता सुखी भव:” वाचण्यासाठी लिंक

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/anndatasb_bhagyashri_patil.pdf



# १४/०२ एक शौर्यकथा

## भाग्यश्री पाटील

**आपल्या प्रिय मातृभूमीसाठी शौर्य आणि त्यागाची पराकाष्ठा करत आपले बलिदान देऊन अमर झालेल्या सर्व शहीद जवानांना समर्पित...**

# || श्री ||

# प्रस्तावना

पुस्तकाबद्दल थोडक्यात सांगायचे झाले तर हे पुस्तक सर्व शहीदांना समर्पित आहे. आजपर्यंत भारतावर जे काही दहशतवादी हल्ले झाले आहेत त्यामध्ये आपले प्राण गमावून देशाचे रक्षण करणाऱ्या सर्व शहीदांच्या शौर्याला माझा सलाम. आपल्या मातृभूमिसाठी आपल्या प्राणाची पर्वा न करता देशाचे रक्षण करताना लढणाऱ्या जवानांना पाहिलं की शिवरायांचे मावळेच त्यांच्या रूपात जणू काही परत आले आहेत असं वाटतं.

जेव्हा एक जवान सीमेवर शहीद होतो तेव्हा देश आपला एक अमुल्य ठेवाच गमावत नाही तर एक पत्नी आपला पती, एक पुत्र आपला पिता आणि एक मातापिता आपला पुत्र गमावत असतात. ही कधीही भरून न निघणारी हानी आहे, असे असले तरी पूर्ण देश आज सर्व शहीदांच्या परिवारांसोबत खंबीरपणे उभा आहे. असाच एक दहशतवादी हल्ला झाला १४ फेब्रुवारी

२०१९ रोजी पुलवामा, काश्मीर येथे. या हल्ल्याने संपूर्ण देश हळहळला. जगभरातून राग प्रतिशोध दुःख अशा संमिश्र प्रतिक्रिया येऊ लागल्या.

ज्या दहशतवादी संघटना आज असे वाईट कृत्य करण्यात पुढे येत आहेत त्यांना हेच सांगावेसे वाटते की, भारत हा एक सुजल, सुफल, संपन्न देश आहे. इथे सुख, शांती, समृद्धी, बंधुभाव आणि माणुसकी नांदते, तसेच भारतीय सेना ही कोणत्याही संकटाला तोंड देण्यास सक्षम आहे. त्यामुळे जो कोणी या पवित्र भुमीबद्दल वाईट चिंतेल वा करेल त्याचा पराभव आणि विनाश होईल हे नक्की.

सर्व शहीदांच्या परिवारांनी आश्वस्त राहावे. पूर्ण देश तुमच्या दुःखात सहभागी आहे. त्यांनी खचून न जाता सर्व शहीदांच्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगावा.

या पुस्तकासाठी मला पदोपदी प्रेरणा देणारा माझा परिवार, मला लिखाणासाठी मदत करणारे माझे सर्व सहकारी, तसेच प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे

जितक्या लोकांनी मला या पुस्तकाच्या पूर्णत्वासाठी मदत केली त्या सर्वांचे मनः पूर्वक आभार. मी सर्वांची सदैव ऋणी राहीन. सर्वांना आत्मबल आणि प्रेरणा मिळावी हाच या पुस्तकाच्या निमित्ताने केलेला छोटासा प्रयत्न. हे पुस्तक सर्वाना प्रेरणा देईल हीच सदिच्छा.

*****

# अनुक्रमणिका


| अक्र | प्रकरण | पान क्र |
|---|---|---|
| १ | तो काळा दिवस | १ |
| २ | शौर्य | ६ |
| ३ | सहनशीलता | ११ |
| ४ | देशभक्तीची प्रेरणा | १५ |
| ५ | एकात्मता | १८ |
| ६ | लाभले भाग्य | २१ |
| ७ | वचन | २४ |
| ८ | भारतीय संस्कृती | २७ |
| ९ | जागृती | ३८ |
| १० | सारांश | ४० |

# प्रकरण १:

# तो काळा दिवस

## दि. १४ फेब्रुवारी २०१९

## ठिकाण: पुलवामा, काश्मीर

यादिवशी दुपारच्या वेळी ३.३० वाजता २५०० सी आर पी एफ जवानांचा ताफा ७० गाड्यामधून सुट्टी संपवून काश्मीरकडून श्रीनगरकडे जात होता (आकडेवारी कमीजास्त होऊ शकते कारण आकडेवारी ही प्रसारमाध्यमे, आणि वेबसाइट्स वरील माहितीचा आधार घेऊन लिहिलेली आहे). अतिशय शिस्तीत एकामागे एक असा हा ताफा चालला असताना अचानक **एक** वाईट घटना घडली. या ताफ्यातल्या एका बसवर अचानक एक गाडी येऊन आदळली. गाडी स्फोटकांनी भरलेली होती. जशी गाडी ताफ्यावर आदळली आणि मोठा स्फोट झाला. काश्मीर पुन्हा एकदा आत्मघाती दहशतवादी हल्ल्याने हादरले. हा स्फोट इतका भीषण होता की त्या बसमध्ये बरेचसे जवान जागीच शहीद झाले आणि कित्येक जखमी

झाले. २४ तासात या शहीदांची संख्या ४० झाली, जखमी जवानांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले. स्फोटानंतरची छायाचित्रे मन हेलाऊन टाकणारी होती. ज्यावेळी हा हल्ला झाला असेल त्याची कल्पनाही करवत नाही. खरंच काय परिस्थिती असेल त्यावेळी तिथे. मला जेवढी माहिती मिळाली त्यानुसार शहीद झालेल्या जवानांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

१.अवधेश कुमार यादव, बहादुरपुर, मुगलसराय, चंदौली, उत्तर प्रदेश

२.पंकज कुमार त्रिपाठी, महराजगंज, उत्तर प्रदेश

३.विजय कुमार मौर्य, छपिया जयदेव, भटनी, देवरिया, उत्तर प्रदेश

४.अमित कुमार, रायपुर, शामली, उत्तर प्रदेश

५.रामवकील, विनायकपुर, मैनपुरी, उत्तर प्रदेश

६.प्रदीप कुमार, बनत, शामली, उत्तर प्रदेश

७.रमेश यादव, तोफापुर, वाराणसी, उत्तर प्रदेश

८.कौशल कुमार, रावत, केहराई, आगरा, उत्तर प्रदेश

९.प्रदीप सिंह, अजान, कन्नौज, उत्तर प्रदेश

१०.श्याम बाबू, रायगवान, कानपुर देहात, उत्तर प्रदेश

११.अजीत कुमार आजाद, लोकनगर, उन्नाव, उत्तर प्रदेश

१२.वीरेंद्र सिंह, मोहम्मदपुर भूरिया, उधम सिंह नगर, उत्तराखंड

१३.मोहन लाल बनकोट, उत्तरकाशी, उत्तराखंड

१४.रतन कुमार ठाकुर, रतनपुर, भागलपुर, बिहार

१५.संजय कुमार सिन्हा, मसौढ़ी, पटना, बिहार

१६.विजय सोरांग, बनगुट्टू, गुमला, झारखंड

१७.नितिन शिवाजी राठौर , बुलडाना, महाराष्ट्र

१८.जीतराम, सुंदरवाली, भरतपुर, राजस्थान

१९.कुलविंदर सिंह, रौली, आनंदपुर साहिब, पंजाब

२०.मानेश्वर बासुमतारी, तामुलपुर, बस्का, असम

२१.नसीर अहमद, डोडासान, रजौरी, जम्मू कश्मीर

२२.जयमल सिंह, धर्मकोट, मोगा, पंजाब

२३.सुखजिंदर सिंह, पट्टी, तरनतारन, पंजाब

२४.तिलकराज, जावली, कांगड़ा, हिमाचल प्रदेश

२५.रोहितास लांबा, शाहपुरा, जयपुर, राजस्थान

२६.वसंत कुमार, वायाथीरी, वायनाड, केरल

२७.जी सुब्रमनयम, सबलपेरी, तूतीकोरीन, तमिलनाडु

२८.गुरु एच, डोडी, मंड्या, कर्नाटक

२९.मनोज कुमार बेहरा, रतनपुर, कटक, ओडिशा

३०.नारायण लाल गुर्जर, बिनौल, राजसमंद, राजस्थान

३१.हेमराज मीणा, विनोद कला, कोटा, राजस्थान

३२.संजय राजपूत, लखानी, बुलढाना, महाराष्ट्र

३३.मनिंदर सिंह, आर्यनगर, दीनानगर, गुरदासपुर,पंजाब

३४.अश्विनी कुमार काछी, कुदावाल, जबलपुर, मध्य प्रदेश

३५.सुदीप विश्वास, हंसपुकरिया, नदिया, पश्चिम बंगाल

३६.शिवचंदर सी, कारगुडी, आरियालूर, तमिलनाडु

३७.भागीरथी सिंग, राजस्थान

३८.बबलू संत्रा, पश्चिम बंगाल

३९.पी. के. साहू, ओडिशा

४०.महेश कुमार, उत्तर प्रदेश

या हल्ल्याने पूर्ण देशाला हादरवून टाकले. तो दिवस सर्वांसाठी काळा दिवसच ठरला.

किती प्रेमाने सर्व जवानांच्या कुटुंबीयांनी पाणावलेल्या डोळयांनी आपल्या प्रियजनांना निरोप दिला असेल! जवानांनाही किती कठीण गेले असेल सर्व प्रेमपाश तोडून येताना. पण देशासाठी मन कणखर करून सगळे निघाले असतील. कुणाला आपल्या पत्नीला सोडून यावे लागत होते, तर कुणाला आपल्या नुकत्याच जन्मलेल्या बाळाला, तर कुणाला आपल्या आई

वडिलांना. खरंच किती निश्चल देशभक्ती आहे ही. आपण सुखरूप परतणार की नाही हे माहित नसताना मन घट्ट करून जातात लढायला. देशसंरक्षणापुढे या जवानांना आपल्या प्राणांचीही पर्वा नसते. या काळ्या दिवशी कोणत्याच परिवाराने असा विचार केला नसेल की आपला पुत्र, पिता, नवरा कोणत्या परिस्थितीत कोणत्या रूपात आपल्याकडे परत येईल.

ज्या भारत देशात आपण मातृभुमीला आई म्हणतो त्याच मातृभूमीचे संरक्षण करणाऱ्या तिच्या लेकरांसोबत असे घडावे? देव तरी इतका निर्दयी कसा झाला असेल? ज्या जगात दुसऱ्याचे प्राण घेणे हा अक्षम्य अपराध आहे तिथे इतक्या लोकांचे प्राण घेऊन कित्येकांना जखमी करून स्वतःचे प्राण घ्यावे अशा व्यक्तीला शिक्षा ती काय द्यावी? आणि द्यायची झाली तरी कशी देणार तो जिवंतच नाहीये तर! काय मनस्थिती झाली असेल त्यावेळी जवानांची? काय होतंय हे कळायच्या आतच स्फोट होऊन होत्याचं नव्हतं

झालं. हे दृश्य इतके हृदयद्रावक आहे की, कल्पना केली तरी प्रत्येक भारतीयाच्या डोळयात पाणी आल्याशिवाय राहणार नाही. जे वीर घरचा निरोप घेऊन परत येण्याचे वचन देऊन गेले होते ते परत आले पण तिरंग्यात लपेटुन. हे दृश्य इतके भावनिक आहे की वीरांच्या शौर्याचे वर्णन करताना जेव्हा शब्द कमी पडतात तेव्हा अश्रुंना वाट मोकळी होते. त्यांची देशभक्ती, त्यांचा त्याग, त्यांचे शौर्य याचे वर्णन खरंच शब्दात करता येईल?

ज्या पुत्राला विजयतिलक करून घरातून पाठवलेले असते तोच पुत्र तिरंग्यात लपेटून येतो तेव्हा त्या मातेला काय वाटत असेल हे तिच्याशिवाय कोणीच नाही समजू शकत. त्यांची कमी ही कायम भासत राहणार.

जे झाले ते भरून काढणे अशक्य आहे पण जे शहीद झाले त्यांचा परिवाराचे अश्रू पुसण्याचे काम आता आपले आहे.

आपण रोज रात्री शांत झोप घेऊ शकतो कारण सीमेवर कोणीतरी रात्रभर डोळयात तेल घालून आपल्या संरक्षणासाठी रात्रभर जागत असतं.

या वीरांचे देशासाठीचे प्रेम, देशभक्ती याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही.

यावेळी मला लता मंगेशकरांनी गायलेल्या ओळी आठवतात,

**"जब घायल हुआ हिमालय… खतरे में पड़ी आज़ादी…**

**जब तक थी साँस लड़े वो.. फिर अपनी लाश बिछा दी..**

**संगीन पे धर कर माथा.. सो गये अमर बलिदानी..**

**जो शहीद हुए हैं उनकी.. ज़रा याद करो क़ुरबानी..”**

****************************************************

# प्रकरण २

# शौर्य

शौर्य, साहस, निर्भीडपणा आणि अपार देशभक्ती यांसारखे शब्द सत्यात उतरलेले पाहायचे असेल तर फक्त एकदा भारतीय सेनेकडे पाहावे! आपोआप सर्व शब्दांचे अर्थ लक्षात येतील. भीती काय असते हे यांना माहीतच नाही आणि पराजय हा शब्द तर यांचा शब्दकोशातच नाही. मरण आले तरी शत्रुला शरण जाणार नाही हीच यांची भावना असते.

भारतीय सेनेचे साहस आणि जिद्द याची प्रचिती त्यांच्या जागी गेल्याशिवाय येऊच शकत नाही. दिवसरात्र ऊन, वारा पाऊस थंडी कशाचाही विचार न करता फक्त फक्त देशसंरक्षणाचा ध्यास घेऊन लढणे म्हणजे एक अलौकिकच गोष्ट आहे. जिथे सामान्य माणूस सर्दीखोकला झाला तरी लगेच दवाखान्याकडे धाव घेतो तिथे या वीरांच्या साहसाचे वर्णन करावे ते कसे. काय खात असतील कसे राहत असतील? 0◦C पेक्षा कमी

तापमानात बंदूक घेऊन कसे रात्रंदिवस पहारे देत असतील? वाळवंटात, उकाड्यात कसे दिवस काढत असतील? हे सर्व आपल्या कल्पनेपलिकडचे आहे. त्यांच्या देशभक्तीची भावनाच इतकी निश्चल असते की त्यापुढे कसलाही त्रास या वीरांना अगदी शुल्लक वाटतो. त्यांचा मनात फक्त एकच ध्यास असतो तो म्हणजे देशभक्तीचा.

भारतीय सेनेमध्ये जेवढे काही दल असतात ते सगळेच प्रामाणिकपणे आपले कर्त्यव्य पार पाडत असतात तेही कसलीच अपेक्षा न करता. ज्या देशात आपण जन्म घेतलाय, जिथे आनंदाने खेळलो, बागडलो तीच मातृभूमी जर त्रासात असेल तर तिचे मुल तिच्या संरक्षणासाठी येणारच.

शत्रू कितीही ताकतवान असो पण भारतीय सैन्याच्या जिद्द आणि शौर्यापुढे तो टिकू शकत नाही हे नक्की. जोपर्यंत शरीरात प्राण आहे तोपर्यंत आपल्या रक्ताचा प्रत्येक थेंब मातृभूमीच्या संरक्षणासाठी अर्पण करतात हे जवान. त्यांना वाटले तर ते सहज आरामदायक जीवन निवडू शकतात पण

त्यांना स्वतःच्या आरामापेक्षा करोडो देशवासीयांची रक्षा करणे जास्त महत्वाचे वाटत असते. भारताचा ध्वज त्यांना सर्वाधिक प्रिय असतो. खरंच यांच्या देशभक्तीचे जितके वर्णन करावे तितके कमीच आहे.

देशासाठी लढताना शहीद होणे यातच या वीरांचे समाधान असते. आपण देशासाठी कामी यावे हीच यांची इच्छा असते. मरण आणि वीरमरण यातला हाच तर फरक आहे. वीर हा मरुनही अमर होतो. मनात नेहमी जिवंत राहतो त्याचे बलिदान देश कधीही विसरू शकत नाही मरण ही अशी गोष्ट आहे की, प्रत्येकाला कधी ना कधी येणारच आहे पण अमर होणे म्हणतात ते हेच. तसं पाहिलं तर भारतीय सेनेच्या अनेक शौर्यकथा आहेत. अगदी इतिहासापासूनच्या. त्या सगळया शौर्यकथा शहीदांच्या नावासहित सांगायच्या म्हणलं तर वेळ आणि कागद दोन्ही अपुरे पडेल.

आता इतिहासापासून कशा म्हणजे काय, तर फक्त काळ आणि माणसांची रूपे बदलली आहेत पण देशभक्ती, जिद्द, धाडस या भावना आहे तशाच

आहेत. इतिहासात छत्रपती शिवाजी महाराज त्यांच्या मावळयांसह अन्यायाविरुद्ध आणि परकीय राजवटींविरुद्ध लढले आणि स्वराज्य स्थापन केले, तसेच इंग्रजाच्या सत्ता विरुद्ध पण कितीतरी क्रांतिकारक लढले आणि शहीद झाले आणि आता आपले वीर जवान सीमेवरती लढत आहेत. म्हणजे हेच की फक्त व्यक्तींची रूपे आणि काळ बदलला आहे पण देशप्रेमाची भावना तीच आहे. आपला देश सुरक्षित असावा हीच भावना आहे.

पुलवामा हल्ल्यात आपले इतके जवान शहीद झाले पण आता वेळ आहे ती गुन्हेगारांना शिक्षा करण्याची. ज्या शत्रूंमुळे आपली इतकी हानी झाली त्यांना आपली सेना सोडणार नाही यात कसलीच शंका नाही. ती प्रत्येक वीराच्या बलिदानाचा बदला घेणार. इथून मागे पण असे हल्ले झाले होते आणि त्या त्या वेळी भारतीय सेनेने शत्रुंना यमसदनी धाडले आहे. यावेळीही प्रत्येक गुन्हेगाराला शिक्षा मिळणारच! जेव्हा हा हल्ला झाला तेव्हा पूर्ण

भारतावर शोक कळा पसरली होती, पण आता सगळयांचे लक्ष वेधले आहे ते गुन्हेगारांना शिक्षा देण्याकडे.

आजपर्यंत भारताने त्याच्या शत्रुंना योग्य ती अद्दल घडवलेली आहे तरी शत्रूंकडून दहशतवादी कारवाया चालूच असतात. भारतीय नौसेना, वायुसेना आणि लष्कर यांनी या हल्ल्यात सहभागी झालेल्या कितीतरी दहशतवाद्यांना कंठस्नान घातले आहे आणि इथून पुढे पण आपल्या मातृभूमीकडे कोणी वक्रदृष्टीने पाहण्याचा प्रयत्न केला तर त्यालाही चांगलीच अद्दल घडेल. आज आपल्या सेनेकडे पाहून प्रत्येक भारतीयाचा ऊर अभिमानाने भरून येत आहे.

दि. १९ फेब्रुवारी रोजी भारतीय सेनेच्या वीर जवानांनी पुलवामा हल्ल्याचा मास्टर माईंड चा खात्मा केला. पुलवामाच्या पिंगलान परिसरात ही चकमक झाली, मात्र या चकमकीत मेजर विभूति ढौंडियाल, हेड कॉन्स्टेबल सेवराम, शिपाई गुलजार अहमद, शिपाई अजयकुमार, शिपाई

हरी सिंह हे वीर शहीद झाले. दि. २६ फेब्रुवारी रोजी भारतीय वायुदलाच्या लढाऊ विमानांनी पाकिस्तानची नियंत्रण रेषा ओलांडून दहशतवादी तळांचा नायनाट केला आणि यानंतर शत्रूंनी समजून घ्यावे की भारताला टक्कर देणे इतके सोपे नाही.

याच शौर्यकथांमध्ये दोन नवे अजून आहेत विंग कमांडर अभिनंदन आणि स्क्वाड्रन लीडर निनाद मांडवगणे.

पुलवामा हल्ल्यानंतर भारतीय हवाईदलाने कितीतरी दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. यांनतर बेसावध राहून चालणार नव्हते. शत्रूकडून कधीच हल्ला होऊ शकतो याचा अंदाज बांधला जातच होता. म्हणूनच गस्त वाढवली जात होती. रात्रंदिवस तिन्ही दल डोळयात तेल घालून पहारे देत होते. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी हल्ला झालाच. मिग-२१ हे भारतीय विमान आणखी ४ विमानांसह पेट्रोलिंग करत असताना १० पाकिस्तानी एफ-१६ विमानांनी हल्ला चढवला. भारताच्या हद्दीत बॉम्बहल्ले सुरु झाले.

त्यावेळी मिग-२१ या विमानांचे पायलट विंग कमांडर अभिनंदन होते. त्यांनी लगेच मोर्चा सांभाळला आणि हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देत पाठलाग करत शत्रूंवर हल्ला चढवला. या चकमकीत एफ-१६ चा खात्मा झाला आणि उरलेल्या विमानांना परत फिरावे लागले. पण यात एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली ती अशी की लढत लढत विंग कमांडर अभिनंदन यांचे विमान अपघातग्रस्त झाले, त्यामुळे त्यांना पॅराशूटच्या साहाय्याने खाली उतरावे लागले. परंतु दुर्दैवाने ते पाकिस्तानी भूमीत उतरले. भारतीय सीमारेषेपासून ७ किमि दूर. त्यांना दुखापत झाली होती. अशा अवस्थेतही न डगमगता खंबीरपणे आलेल्या परिस्थितीला तोंड द्यायचे असे त्यांनी ठरवले होते. त्यांना तिथे पाकिस्तानी नागरिकांची मारहाणही झाली. त्यानंतर पाकिस्तानी सैन्याने त्यांना ताब्यात घेतले. ही गोष्ट खरतर खूप गंभीर होती कारण आजपर्यंत पाकिस्तानचा इतिहास पहिला असता शत्रुपक्षाचा माणूस ताब्यात आल्यावर ते काय करतात याची कल्पना केली तरी थरकाप उडेल असा आहे. भारताने एव्हाना त्यांच्या सुटकेची तयारी

चालू केली होती. अखेर सर्व भारतीयांच्या प्रार्थना यश आले आणि त्यांची सुटका झाली. शत्रुच्या भुमितसुद्धा इतक्या धैर्याने येणाऱ्या प्रसंगाला तोंड देणे म्हणजे दिव्यच! आणि ते विंग कमांडर अभिनंदन यांनी करून दाखवले.

दुसरे नाव आहे शहीद निनाद मांडवगणे यांचे. २७ फेब्रुवारी रोजी श्रीनगर मध्ये झालेल्या चकमकीत वीर शहीद स्क्वॉड्रन लीडर निनाद मांडवगणे यांना वीरमरण आले. काश्मीरच्या बडगाम जिल्ह्यात भारतीय हवाई दलाचे एमआय-१७ हेलिकॉप्टर कोसळून पायलट स्क्वॉड्रन लीडर निनाद मांडवगणे यांच्यासह सात जण शहीद झाले.

१ मार्च हा दिवस आनंद आणि दुःख दोन्हींचा होता. एकीकडे पाकिस्तानकडून विंग कमांडर अभिनंदन यांचं सुटका होतं होती पुर्ण देश त्यांच्या शौर्याला सलाम करायला उत्साहात होता तर दुसरीकडे एका वीरपुत्राला कायमचा निरोप दिला जात होता. हे खुप भावनिक दृश्य होते.

मी आधीच म्हणलं तसं हे आणि असेच कितीतरी वीर देशासाठी शहीद झाले आहेत, आणि रोज होत आहेत. खरंच खूप त्रास होतो जेव्हा सीमेवरून कोणी ना कोणी शहीद झाल्याच्या बातम्या येतात तेव्हा.

या वीरांच्या बलिदानाला देशाचा सलाम! देश कुठल्याच वीराचे बलिदान कधीच विसरणार नाही आणि हेच बलिदान सर्व तरुण पिढीला कायम प्रेरणा देत राहील.

****************************************************

# प्रकरण ३

# सहनशीलता

ज्याप्रमाणे शौर्य, जिद्द हे महत्वाचे गुण आहेत त्याप्रमाणेच साहस आणि सहनशीलता हेदेखील तितकेच महत्वाचे. हे सर्व गुण असतात स्त्री मध्ये! म्हणुन तर म्हणतात**, "प्रत्येक कर्तुत्ववान पुरुषाच्या मागे एक स्त्री असते"**. मग ती माता, पत्नी, बहीण, मैत्रीण, मुलगीही असु शकते. सीमेवर जे वीर जवान धाडस आणि शौर्याने लढून सीमेचे रक्षण करत असतात त्याचप्रमाणे त्यांच्या घरी त्यांच्या माता, पत्नी घराची काळजी घेत असतात. थोडक्यात काय तर एक सैनिक होण्यासाठी जितके धाडस लागते तितकेच धाडस, किंबहुना त्यापेक्षा जास्त धाडस हे वीरमाता किंवा वीरपत्नी होण्यासाठी लागते, कारण त्याच आपल्या वीरांना खंबीरपणे साथ आणि लढण्याची प्रेरणा देत असतात. आज कितीतरी वीरमाता आणि वीरपत्नींच्या बलिदानातूनच तर आपले राष्ट्र सुरक्षित बनले आहे.

म्हणूनच म्हणावेसे वाटते,

**सावित्रीची लेक तू,**

**आत्मसन्मानाची ज्योत हाती घेवुन, अडथळयांना लाथाडुन,**

**सदैव पुढे जा तू,**

**सीतेची उपेक्षा तू दे आता धुडकावुन, नको हतबलता त्या द्रौपदीची,**

**विचार जाब तू खडसावुन.. अबला तू सबला तू ...**

**नको अडकवुस स्वतःला आता त्या विशेषणात तू ..**

**झाशीच्या राणीची शक्ती तू ..**

**मिराबाईची भक्ती तू ..वात्सल्याची सिंधुताई तू ..**

**घराघरातली मुक्ताबाई तू ..ओठांवरची जना तू..**

**बहिणाबाईच्या मनात तू.. शान्ताबाईंच्या ह्रुदयात तू ..**

**लतादिदींच्या सुरात तू ..**

**घे भरारी तू कल्पनेची.. जगण्याच्या शर्यतीत धाव..**

**स्फूर्ती घे त्या उषेची..**

**स्पर्धेच्या संग्रामात टिकण्यासाठी शपथ तुला त्या रझियाची..**

**अहिल्याबाईचं रूप तू..**

**जिजामातेचं स्वरूप तू तुझं...**

**आईचं काळीज घेऊन जाताना पडलेल्या मुलाच्या वेदनेने हळहळणारी**

**माता तू ..**

**मानवतेची जननी तू ....पण रहा सदैव मानिनी तू..**

जिजाऊंनी जसं शिवरायांना घडवलं तसंच आज अनेक वीरमाता आपल्या जवानांना देशभक्तीची प्रेरणा देत घडवत आहेत. खरंच एखादे कार्य करणे जितकी मोठी गोष्ट आहे त्याहूनही मोठी गोष्ट म्हणजे ते कार्य करण्यासाठी एखाद्याला प्रेरणा देणे, त्याला घडवणे, आणि यासाठी खूप सहनशीलता आणि कणखरपणा लागतो.

ज्या आईने जन्म दिला त्या आईसमोर तिचे मुल शहीद होऊन माघारी येत असेल तेव्हा काय अवस्था होत असेल तिच्या मनाची हे कल्पनेपलीकडचे

आहे. सीमेवर लढता लढता आपल्या मुलाचे प्राणदेखील जाऊ शकतात हे माहित असूनदेखील त्याला लढण्यासाठी, देशसेवेसाठी पाठवणे यासाठी लागणारे धाडस कुठून आणत असतील या माता? लहानपणी आपल्या बाळाला कुठे थोडे खरचटले तरी डोळयात पाणी येणारी आई, आणि तरुणपणी त्याच मुलाला सीमेवर पाठवणारी आई, किती फरक आहे या दोन वेगवेगळया व्यक्तिरेखांमध्ये.

भारत हा असा देश आहे की ज्यामध्ये प्राचीन काळापासूनच मातांनी थोर वीरपुरुष घडवलेले आहेत, आणि त्यामुळेच तर आज प्रत्येकाला प्रत्येक गोष्टीचे स्वातंत्र्य मिळाले आहे. आज कदाचित आपल्याला आपले आयुष्य खूप सहज आणि सोपे वाटत आहे, कारण आपल्याकडे आज स्वातंत्र्य आहे, लोकशाही आहे पण हे मिळवण्यासाठी कितीतरी मातांनी आपले पुत्र गमावले आहेत.

वीरमातांच्या निस्सीम देशभक्ती आणि कणखरतेची अनेक उदाहरणे आहेत**. "जिजाऊंनी शिवराय घडवलेच नसते तर स्वराज्य स्थापन झालेच नसते"** हे अगदीच सहज तोंडातून बाहेर पडणार वाक्य. पण जिजाऊ बनणे इतके सोपे नव्हते. आज कल्पना करा की जेव्हा शिवाजी महाराज अफजलखानाला भेटण्यास गेले होते तेव्हा काय घालमेल झाली असेल त्या माऊलीच्या जीवाची? इतिहासातील अफजलखानाचे वर्णन हे भल्याभल्याना घाम फुटावा असे आहे. मग त्याच्या समोर जाणे तर सोडाच पण त्याच्याशी लढण्याचा विचार सुद्धा कोणी करू शकणार नव्हतं. अशा परिस्थितीत सुद्धा स्वराज्यरक्षणासाठी, स्वराज्यातील जनतेच्या भल्यासाठी जिजाऊंनी शिवरायांना जाऊ देण्याचे धाडस केलेच! त्यामुळेच शिवरायांनी सुद्धा अफजलखानासारख्या अवाढव्य संकटाचा सामना करत त्याला यमसदनी धाडले. आजही कित्येक जवान सीमेवर जखमी होतात कितीतरी शहीद होतात. पण त्यांच्या मातांच्या मुलाखती ऐकल्या की खरंच खूप कौतुक वाटतं. त्यांना अभिमान वाटत असतो की, आपला पुत्र

देशसंरक्षणासारख्या महान कामी आला. हे धाडस फक्त भारतीय माताच करू शकतात, आणि करत आहेत.

मातांप्रमाणेच वीरांच्या शौर्यात सिंहाचा वाटा असतो तो त्यांच्या पत्नींचा. वीरपत्नी होणे ही जितकी अभिमानाची गोष्ट आहे तितकीच धाडसाची. स्वतःच्या घराचं रक्षण तर सगळेच करतात पण प्राण हातावर घेऊन पूर्ण देशाचे रक्षण करणाऱ्या जवानाची पत्नी होणे यापेक्षा मोठे भाग्य नाही. आज कित्येक जवानांच्या पत्नी वीरांच्या खांद्याला खांदा लावून सेनेत दाखल होत आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर डिसेंबर २०१७ मध्ये अरुणाचल प्रदेशातील तवांग येथे कर्तव्य बजावत असताना शहीद झालेले मेजर शहीद प्रसाद महाडिक यांच्या पत्नी गौरी महाडिक यांनी सेनेत दाखल होण्याचा निर्णय घेतला आहे आणि लवकरच त्याची प्रक्रिया पूर्ण होईल. गौरी यांनी सर्वच महिलांसाठी एक आदर्श स्थापन केला आहे. त्यांनी मुलाखतीत सांगितलं की, शहीद प्रसाद यांना वीरमरण आल्यानंतर १० दिवसातच त्यांनी हे ठरवलं होतं, आणि ते करूनही दाखवलं. आणखी एक

उदाहरण म्हणजे शत्रूंच्या हाती लागूनसुद्धा शौर्याची पराकाष्ठा करणारे विंग कमांडर अभिनंदन यांच्या पत्नी तन्वी मरवाहा यांनी देखील भारतीय हवाईदलात राहून आपले कर्तव्य बजावलेले आहे. या आणि अशा कित्येक वीरपत्नी आपल्या देशाला लाभल्या आहेत त्यामुळे देश सुरक्षित आहे. वीरपत्नी होण्यात जो काही सन्मान आणि कणखरता आहे ती दुसऱ्या कशातच नाही. आज कित्येक जवान सीमेवर लढतात त्यांना प्रेरणा देण्याचे काम या वीरपत्नी आणि वीरमाता करत असतात.

एक वीरपत्नी म्हणजे चिंतांचे माहेरघरच जणू! सीमेवर जवान रात्रंदिवस डोळयात तेल घालून देशासाठी जागतात आणि त्यांच्या पत्नी आपल्या पतींच्या काळजीत. कुठे बॉम्बहल्ला झाला, कुठे स्ट्राइक झाली की आपला पती सुखरूप असेल की नाही या जाणिवेनेच त्यांना धडधडत असेल. आपले पती कुठल्याही क्षणी तिरंग्यात लपेटून येऊ शकतात ही कधीही न संपणारी चिंता आहे. कुठे एखादी बातमी येईल, आणि आपल्या पतीच्या

नावामागे शहीद लागेल सांगता येत नाही. अशा कठीण परस्थितीतही संयमाने घर सांभाळणारी स्त्री दुर्गेचेच रूप आहे.

जरी जवान सीमेवर भारताचे रक्षण करत असतील तरी आपणही एक समाज म्हणून त्यांच्या पाठीशी उभे राहणे, त्यांना प्रेरणा देणे खूप गरजेचे आहे. जेव्हा जवानांना समजेल की  पुर्ण देश त्यांच्या पाठीशी आहे फक्त त्यांचे कुटुंबच नाही तर पूर्ण देशाला त्यांचा अभिमान आहे आणि सीमेवर त्यांना वीरमरण जरी आले तरी त्यांचे कुटुंब पूर्णपणे सुरक्षित आणि सुखात असेल याची खात्री त्यांना पटेल, तेव्हा निश्चितच ते जास्त जोमाने देशाची सुरक्षा करतील. प्रत्येकाने देशाप्रती आपले कर्तव्य जाणले पाहिजे. प्रत्येकाने कमीत कमी एका तरी जवानाच्या कुटुंबाची मदत केली पाहिजे. मदत ही आर्थिकच नाही तर भावनिकसुद्धा असू शकते. जेणेकरून त्या कुटुंबाना धीर येईल, समाजात सन्मानाचं स्थान मिळेल. एखाद्या कुटुंबाने आपला जवान गमावला असेल त्यांचे दुःख थोडेसे हलके होईल.

आज अनेक संस्था शहीदांच्या परिवाराच्या मदतीसाठी पुढे येत आहेत. कित्येक डॉक्टरांनी शहीदांच्या परिवारांना विनामुल्य वैद्यकीय मदत करण्याची तयारी दाखवली आहे. हे खरंच खूप कौतुकास्पद आहे. कित्येक सामाजिक कार्यकर्ते, तसेच विविध क्षेत्रातील लोकही या कार्यासाठी पुढे येत आहेत. हे कार्य, ही वाटचाल खूप खूप यशस्वी व्हावी, जास्तीत जास्त शहीदांच्या कुटुंबाना याचा फायदा मिळावा हीच सदिच्छा !

*****************************************************

# प्रकरण ४

# देशभक्तीची प्रेरणा

देशप्रेम, देशभक्ती यांचे बाळकडु प्रत्येक भारतीयाला लहानपणापासून पाजले जाते. अगदी शाळेत दिवसाची सुरुवातच राष्ट्रगीत आणि प्रतिज्ञा यांनी करतात. प्रत्येक २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट देशभक्तीने ओतप्रोत होऊन साजरा करतात. खरं पाहिलं तर आपल्या मातृभुमीवर प्रेम करण्यासाठी कुठल्या प्रेरणेची गरजच नाही ती आतून येते.

**हे राष्ट्र देवतांचे....हे राष्ट्र प्रेषितांचे...**

**आचंद्रसूर्य नांदो...स्वातंत्र्य भारताचे..**

किती सुंदर गीत आहे हे..! आणि का असू नये? प्रत्येक भारतीयांची आज हीच इच्छा आहे, आणि हेच स्वातंत्र्य कायम टिकवून ठेवायचे असेल तर सर्वांनी एकत्र आले पाहिजे.

एखाद्या गोष्टीची किंमत ती नसल्याशिवाय कळत नाही असे म्हणतात, म्हणुनच स्वातंत्र्याची किंमत पारतंत्र्याशिवाय कळत नाही. सर्व भारतीय जनतेला ही किंमत कळून चुकली आहे, त्यामुळेच तर आज कित्येक महात्म्यांच्या बलिदानातून देशाला स्वातंत्र्य मिळाले आहे. मिळाले आहे म्हणण्यापेक्षा आपण ते लढून मिळवले आहे असं म्हणलं तर वावगं ठरणार नाही. एखादी मौल्यवान गोष्ट मिळवणे जितके अवघड असते त्यापेक्षाही अधिक अवघड असते ती टिकवणे. म्हणूनच आज आपले स्वातंत्र्य टिकवणे खूप गरजेचे आहे. परकीय सत्ता परकीय लोक यापासून देशाला होणारी हानी थांबली पाहिजे. हे फक्त सेनेचेच कर्तव्य नाही तर आपले पण आहे.

देशभक्तीची ज्योत ही प्रत्येक देशवासीयांच्या मनात तेवत असतेच, पण खूप थोडे लोक ते कृतीतुन साध्य करतात. खरंच फक्त लष्कराने एकट्याने देशहिताचा हेतू सध्या होणार आहे का? आज सर्व देशाचा आपल्या लष्करावर पूर्ण विश्वास आहे ते कुठल्याही संकटाचा खात्मा करण्यास समर्थ आहेत. येणाऱ्या शत्रूवर आगीचा लोळ होऊन कोसळणाऱ्या आमच्या वीर

जवानांच्या शौर्यावर आम्हाला तसूभरही शंका नाही, पण हे कर्तव्य त्यांचे एकट्याचे आहे का? आपणही त्यांना त्यांच्या या महान कार्यात थोडा हातभार लावला तर त्यांचा भर थोडा हलका होणार नाही का? आपणही थोडं जागरूक राहील तर?

आज सार्वजनिक ठिकाणी किंवा गर्दीच्या ठिकाणी बॉम्बस्फोट होतात दहशवादी हल्ले होतात. हे आपण आपल्या जागृकतेनं थांबवू शकतो. आज बस स्टॅण्डवर, एरपोर्टवर, गर्दीच्या ठिकाणी आपल्याला काही आक्षेपार्ह वस्तू दिसल्या किंवा एखाद्या व्यक्तीवर संशय आला तर आपण लगेच पोलिसांना याची माहिती देऊ शकतो, आणि कदाचित होणार अनर्थ वेळीच टाळूही शकतो. या आणि अशाच सूचना सतत पोलीस किंवा सैन्यदलाकडून दिल्या जातात. नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले जाते. पण आपण फक्त मेसेज इकडून तिकडे फॉरवर्ड करत असतो. आता असंही नाही की पूर्वीसारखं एक संदेश दुसरीकडं पोचवायला फार काळ लागतो. आजकाल सेकंदात इकडचं संदेश कितीतरी दूर जातो मग थोडं जागरूक

राहून आपण स्वतःचीच मदत करत आहोत, पर्यायाने देशाची मदत करत आहोत, मग हे आपण का करू नये?

देशभक्ती म्हणजे नक्की काय? सतत देशभक्तीपर गीते म्हणणे, मोबाईलवरून देशभक्तीपर संदेश एकमेकांना पाठवणे, एखाद्या शहीदाच्या फोटोला हार घालणे, त्यावर भाषणे देणे, १५ ऑगस्ट २६ जानेवारी ला तिरंगा हातात घेऊन फिरणे, एखादा दहशतवादी हल्ला झाल्यावर त्याच्या निषेधार्थ घोषणाबाजी करणे, की सोशल साईट्सवर निषेधार्थ पोस्ट टाकणे ही?

माझ्या मते देशभक्ती म्हणजे निरपेक्ष,निस्वार्थी प्रेम. जसे प्रेम आपली आई आपल्यावर करते, त्याचप्रमाणे आपण आपल्या मातृभूमीवर केले पाहिजे. जसे आपण आपल्या आईची निस्वार्थपणे सेवा करतो तशी आपल्या मातृभूमीची केली पाहिजे. देशाने आपल्याला काय दिले यापेक्षा आपण समाजाला आणि देशाला काय देऊ शकतो हे पहिले पाहजे. हाच हेतू आहे या पुस्तकामागचा. हे पुस्तक वाचून एका जरी शहीदाच्या कुटुंबियांचे

मनोबल वाढले, त्यांचे दुःख मी थोडे कमी करू शकले, अथवा समाजातील एका जरी व्यक्तीचा देशभक्तीचा दृष्टिकोन बदलला तरी या लिखाणाचे सार्थक झाले असे वाटेल मला.

*****************************************************

# प्रकरण ५

# एकात्मता

आपण सगळे एक आहोत, आपल्यात कुठलाही भेदभाव नाही, कुणीही लहान, कुणी मोठा नाही ही भावना जपणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता. ही मने जोडण्याची प्रक्रिया आहे. आपल्या देशाविषयी वाटणारी आपुलकी म्हणजे एकात्मता. ती आपोआप निर्माण होत नाही, ती आपण जोपासावी लागते. विविधतेतील एकता हे आपल्या एकात्मतेचे सूत्र आहे.

एकात्मतेचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे भारतीय सेना. पुलवामा मध्ये झालेल्या हल्ल्यात शहीद झालेले सर्व जवान हे वेगवेगळया राज्यातील होते. तिथे कुणाची धर्म, प्रांत पाहिला जात नाही. सीमेवर लढताना कुणी गुजराती, बंगाली, महाराष्ट्रीयन असा नसतो तर प्रत्येकजण भारतीय असतो. राज्य वेगळी असतीलही कदाचित पण मन तर भारतीय असते.

पुलवामा हल्ला झाला तेव्हा सर्व भारतीय एकत्र आले तेही धर्मनिरपेक्ष. सर्वांची एकच मागणी होती की हे वाईट कृत्य करणाऱ्यांना शिक्षा मिळावी.

एकात्मता जपायला हवी असे म्हणणे तर महत्वाचे आहेच, पण या एकात्मतेला जपण्यासाठी आपण काय करू शकतो हे पहिले पाहिजे. एकीकडे आपण विविधतेत एकता मानतो आणि दुसरीकडे जातीय दंगली होतात. कित्येक लोकांचे नाहक बळी जातात. वातावरण अशांत होते. या दंगलींमागचे कारण म्हणजे काही मुठभर समाजकंटक स्वतःच्या स्वार्थासाठी या दंगली घडवून आणतात आणि आपल्यासारखे सामान्य लोक यात भरडले जातात. याने साध्य तर काही होणार नसते पण लोक अविचाराने कृत्य करतात आणि शेवटी पश्चातापाशिवाय काहीच हाती लागत नाही.

आपण एक गोष्ट समजून घेत नाही की एकीचे बळ खूप आहे. आपण सर्व एकत्र असू तर येणाऱ्या कोणत्याही संकटावर आपण सहज मात करू

शकतो, आणि सर्वांना एकत्रच राहावे लागणार आहे, तरच देश सुरक्षित राहील. संकट हे जात धर्म बघून येत नाही ते सर्वांवरच येते. मग त्याचा सामनाही एकत्रच करायला हवा. इतिहास पाहिला तर एकीचे बळ समजून येईल. छत्रपती शिवाजी महाराजांनी एकाच प्रयत्न केला की, परकीय राजवटींविरुद्ध सगळे मावळे एकत्र आले पाहिजेत, आणि त्यांनी ते करून देखील दाखवले. त्यांनी जात, धर्म न पाहता गुणांना महत्व दिले. कोणाही व्यक्तीला त्याच्या जाती, धर्मावरून नाही तर गुणांवरून पारखले. सर्वांना एकाच भगव्याखाली घेत मावळे म्हटले. तेव्हा एकी झाली नसती तर स्वराज्य स्थापन झाले असते का?

माणुसकी हा परमधर्म मानणारी संस्कृती आहे आपली. निसर्ग तरी कधी भेदभाव करतो का माणसात? अशावेळी खरंच **"लहानपण देगा देवा"** म्हणावेसे वाटते, कारण लहान असताना अशा भावना कधीच मनात येत नाहीत. निरागसता असते सर्वांना एकाच दृष्टीने पाहण्याची. ना कुठला द्वेष

ना तिरस्कार. ना मानाची इच्छा ना अपमानाची भीती. अगदी निर्धास्त असते आयुष्य. पण जसजसे आपण मोठे होत जातो तसतशा या भावना मनात घर करायला चालू करतात. याला जबाबदार काही अंशी सगळेच असतात. या अशा भावनांना वेळीच आवर घातली नाही तर परिणाम किती भयंकर असू शकतात हे दंगली पाहिल्यावर कळते हे थांबवायचे असेल तर सुरवात स्वतःपासुन करायला हवी.

देशांतर्गत कायदा, शांतता, सुव्यवस्था राखणे हे फक्त पोलीस, लष्कर यांचेच नाही तर सर्वांचेच कर्तव्य आहे. पोलीस गुन्हेगाराला शिक्षा करतीलही, पण त्याच्यातली गुन्हेगारी संपवायची असेल तर समाजानेही त्याला मदत केली पाहिजे. आज कितीतरी गुन्हेगार शिक्षा संपवून बाहेर पडून सरळ मार्गाने जगण्याचा प्रयत्न करतात पण समाज त्यांना स्वीकारत नाही त्यामुळे त्यांचा नैराश्य आणि समाजाबद्दल द्वेष निर्माण होतो. सुधारण्याची संधी प्रत्येकालाच मिळायला पाहिजे, हे आपण जाणले

पाहिजे. आपल्याच घरातल्या व्यक्तीने एखादी चूक केली तर आपण त्याला सुधारण्याची संधी देतोच ना! जगात एकही माणूस असा नाही की जो कधी चुकत नाही. चुका सर्वांकडूनच होतात, पण त्या समजून जर कुणी सुधारण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याला स्वीकारून सहकार्य करावे.

जर देशात अराजकता असेल तर देश सुखी राहू शकणार नाही. जेव्हा जेव्हा आपल्या मनात द्वेष, तिरस्कार या भावना येतील, तेव्हा तेव्हा त्याचा त्याग करून त्यावर विजय मिळवावा. कुणीही कितीही चुकीचा मार्ग दाखवला तरी त्यावर चालायचे की नाही ते आपल्या हातात आहे. त्यासाठी स्वतःसाठी रोज थोडातरी वेळ काढावा. जगासाठी आपण नेहमी फ्री असतो, पण आपल्या स्वतःशी बोलण्याची वेळ येते तेव्हा आपल्या लाईन्स व्यस्त लागतात. दररोज थोडे चिंतन करावे. जास्त नाही किमान झोपण्याआधी १५ मिनिटे विचार करा, आज मी काही चुकीचे तर वागलो नाही ना, कोणाला फसवले तर नाही ना, खोटं तर बोललो नाही ना, कोणाला दुखावले

तर नाही ना, कुणाचे वाईट तर चिंतले नाही ना, कुणाचा तळतळाट तर घेतला नाही ना, समोर अन्याय होत असताना मी थांबवू शकत असताना गप्प तर राहिलो नाही ना, एवढेच केले तरी खूप फरक जाणवेल. स्वतःचा उणीव आणि सामर्थ्य कळेल आणि वरील सर्व प्रश्नांची उत्तरे नाही अशी असतील तर नक्कीच शांत झोप लागेल याची मला खात्री आहे.

ही एकात्मता जपण्याचा सर्वांनी असा प्रयत्न करावा ही सदिच्छा !!

****************************************************

# प्रकरण ६

# लाभले भाग्य

भारत हा एकमेव असा देश आहे की जिथं सर्व जातीधर्मांचे लोक एकत्र राहतात. या देशात राहणाऱ्या प्रत्येकालाच अभिमान आहे की, त्याचा जन्म या देशात झाला. आपण सर्व खुप भाग्यवान आहोत की, आपला जन्म त्या पवित्र भुमीत झाला आहे जिथं सुख शांत नांदते, जिथे असे लोक आहेत की, ते स्वतःच्या आधी देशाचा विचार करतात, जिथे स्वहितापेक्षा समाजहिताच्या प्राधान्य दिले जाते, जिथे सैन्याच्या शौर्यापुढे शत्रूही भयभीत होतो, जिथे एक अशी सेना आहे जी राष्ट्राच्या संरक्षणासाठी भिंत बनून उभी आहे.

आपली सेना ही पूर्णपणे निस्वार्थी भावनेने देशसेवा करत असते अगदी निसर्गासारखी. निसर्ग सतत सर्वांना काही ना काही देत असतो, तेही

कुठलीचीच अपेक्षा न करता. वृक्ष सर्व सृष्टीला फळे, फुले, सावली देतात. त्यांना आपण दगड जरी मारले तरी ते बदल्यात कधीही कोणतीही अपायकारक गोष्ट करणार नाहीत. मग ज्या वृक्षांना बोलताही येत नाही आपल्या भावना व्यक्त करता येत नाहीत, ते जर सर्वांसाठी इतकं करतात तर आपण तर मनुष्य आहोत. आपण तर जास्त निस्वार्थी व्हायला हवे. पण असे खुप कमी लोकांना जमते, कारण मानवी स्वभाव म्हटलं की राग, इर्ष्या, तिरस्कार या भावना स्वभावातच असतात, पण जे लोक या भावनांवर विजय मिळवून जनहितासाठी आपले आयुष्य पणाला लावतात ते कायम समाजाला लक्षात राहतात, आणि भारतीय सैन्यदल याचे उत्तम उदाहरण आहे. कितीही त्रास झाला तरी आपल्या मातृभूमीच्या संरक्षणाचा ध्यास घेऊन गेल्या कित्येक वर्षांपासून भारतीय सेना सीमेवर उभी आहे. केवढा तो त्याग आणि केवढे ते धाडस! प्रत्येक व्यवसाय किंवा क्षेत्रात सुट्ट्या या असतातच. पण देशसंरक्षण करणाऱ्या सेनेला कधीच सुट्टी नसते. कधीही कुठे काही प्रसंग ओढवला की त्यांना लगेच कामावर हजर व्हावे लागते.

**निश्चयाचा महामेरू..**

**बहुत जनांसी आधारु..**

**अखंड स्थितीचा निर्धारु ..**

**श्रीमंतयोगी..**

हा शिवरायांचा विचार घेऊन आज आपली सेना लढत आहे. हे शब्द सेनेसाठी वापरले तर काही वावगं ठरणार नाही, कारण आपली सेना म्हणजे शिवरायांचे मावळे तर आहेत. अशा या थोर सेनेचे कौतुक करावे तेवढे कमीच!

अशा वीर जवानांबद्दल आपण नेहमी कृतज्ञ राहावे असे मला वाटते, आणि त्यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कुठला दिवस किंवा वेळ पाहू नये. जेव्हा संधी मिळेल तेव्हा ती व्यक्त करावी म्हणजे त्यांनाही बरे वाटेल.

पोलीस खात्यात २१ ऑक्टोबरला एक कृतज्ञता किंवा स्मृतिदिन साजरा होत असतो हे खुप कमी लोकांना माहित असेल. देशातील सर्व राज्यांमध्ये या दिवशी कृतज्ञता परेड असते. सामान्य नागरिकांचे रक्षण करताना, अतिरेक्यांशी लढताना, ज्या पोलीस कर्मचाऱ्यांना आपले प्राण गमवावे लागले त्यांच्या स्मृतींना मानवंदना देतात. अशा वेळी तिथे लोकांना जास्तीत जास्त सहभाग असावा जेणेकरून आपल्या सैन्यदलात पण वाटेल की, आपण त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञ आहोत.

या निमित्ताने मध्यंतरी माझ्या वाचनात आलेली एक कथा मला सांगावीशी वाटते.

एक सुंदर तरुणी विमानात तिची सीट शोधत होती. तिनं पाहिलं की तिच्या सीटच्या बाजूला दोन हात नसलेली एक अपंग व्यक्ती बसली आहे. त्या व्यक्तीच्या शेजारी बसणं तिला प्रशस्त वाटलं नाही. ती एअरहोस्टेसला म्हणाली, "मी ह्या दोन हात नसलेल्या माणसाच्या शेजारच्या सीटवर बसून सुखाने प्रवास करू शकणार नाही. मला अशी माणसं आवडत नाहीत, म्हणून

मला सीट बदलून देण्यात यावी. "मॅडम, इकॉनॉमी क्लासमध्ये एकही सीट रिकामी नाहीये. मी विमानाच्या कॅप्टनशी बोलून बघते", असं म्हणून एअरहोस्टेस निघून गेली..

थोड्यावेळाने एअरहोस्टेस आली आणि त्या सुंदर तरुणीला म्हणाली, "मॅडम, तुम्हाला होत असलेल्या त्रासाबद्दल आम्ही दिलगीर आहोत. ह्या संपूर्ण विमानात प्रथम श्रेणीत एक जागा रिकामी आहे. मी माझ्या टीमशी बोलले. एका व्यक्तीला इकॉनॉमी वर्गातून प्रथमश्रेणी वर्गात बसवण्याची परवानगी आमच्या विमान कंपनीने दिली आहे.

त्या सुंदर तरुणीला खूप आनंद झाला, यावर ती काही बोलणार एवढ्यात एअरहोस्टेस त्या दोन हात नसलेल्या व्यक्तीजवळ गेली आणि त्याला विचारलं, "सर, आपण प्रथम श्रेणी वर्गात जाऊन बसाल का? एका शिष्टाचार नसलेल्या प्रवाश्याबरोबर आपण प्रवास करून कंटाळून जाऊ नये असं आम्हाला मनापासून वाटतं." यावर विमानातल्या सर्व प्रवाश्यांनी या

निर्णयाचं टाळ्या वाजवून स्वागत केलं. ती सुंदर तरुणी शरमेने मान खाली घालून बसली.

ती अपंग व्यक्ती उठून उभी राहिली आणि म्हणाली, **"मी एक माजी सैनिक आहे"**, एका ऑपरेशन दरम्यान काश्मीर सीमेवर एका बॉम्ब स्फोटात माझे दोन्ही हात गेले. सर्वात प्रथम जेंव्हा मी ह्या सुंदर महिलेचे वक्तव्य ऐकले तेंव्हा मी विचार करू लागलो, की कोणत्या लोकांच्या सुरक्षिततेसाठी मी माझे प्राण संकटात टाकून दोन हात गमावले. पण तुमची प्रतिक्रिया ऐकल्यावर स्वतःचा अभिमान वाटू लागला की मी माझ्या देशासाठी, देशातील लोकांसाठी माझे दोन्ही हात गमावले." असं म्हणून तो अपंग सैनिक प्रथम श्रेणी वर्गात गेला. ती तरुणी शरमेने मान खाली घालून बसली.

जर विचारात उदारता नसेल तर अशा बाह्य सौंदर्याला काडीची देखील किंमत नसते हेच खरं! त्यामुळे बाह्य सुंदरतेपेक्षा मनाची सुंदरता महत्वाची.

आपले शुर सैनिक सीमेवर तळहातावर प्राण घेउन लढत आहेत म्हणूनच तुमची सत्ता, संपत्ती, आणि सौंदर्य सुरक्षित आहे, हे कधीच विसरू नका.

*****************************************************

# प्रकरण ७

# वचन

कुठे एखादा गुन्हा घडला, हल्ला झाला की आपण अगदी सहजच सगळा दोष पोलीस यंत्रणेला किंवा सेनेला देतो, त्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करतो. पण खरंच हे कितपत योग्य आहे? त्यांची बाजू जाणून घेण्याचा प्रयत्न आपण कधी केलाय का? तेही माणूस आहेत, त्यांनाही मन आहे, भावना आहेत. आज कित्येक पोलीस कर्मचारी ताणतणावमुळे आत्महत्या करत आहेत, याला कारण काय? जर निस्वार्थीपणे स्वतःचा जीव धोक्यात घालून सेवाकार्य करणाऱ्या माणसाला टीका, अपमान, घृणा यासारख्या गोष्टींना सामोरे जावे लागले तर साहजिकच तो खचणार, आणि याला जबाबदार समाज आहे.

खुप वाईट वाटते जेव्हा एखादा जवान शहीद होतो आणि त्याच्या कुटूंबाची आबाळ होते तेव्हा. खुप वाईट वाटते जेव्हा आपले जवान

काश्मीरमध्ये जनतेच्या सुरक्षेसाठी जातात आणि तिथली जनता त्यांच्यावरच दगडफेक करते तेव्हा. खुप वाईट वाटते जेव्हा एखादा दहशतवादी हल्ला झाल्यावर आपण सैनिकांच्या परिवाराचे सांत्वन करण्याऐवजी संबंधित घटनांचे फोटो विडिओ वायरल करण्यात बिझी असतो तेव्हा. हे असे फोटो विडिओ बघून सैनिकांच्या कुटुंबियांवर काय परिणाम होत असेल याचा विचार कधी केलाय का आपण? हे शहीदांच्या परिवाराच्या दृष्टीने तर चुकीचे आहेच पण देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने सुद्धा घातक आहे, आणि सगळयात वाईट तर तेव्हा वाटत जेव्हा आपले सैन्य एखादी सर्जिकल किंवा एअर स्ट्राइक करून स्वतःचा जीव धोक्यात घालून शत्रूंचा खात्मा करून येते आणि या गोष्टीचे राजकारण होते आपल्या शौर्याचा कामगिरीचा कार्याचा पुरावा देशाला द्यावा लागणे यापेक्षा मोठे दुर्दैव असू शकेल का?

हे कुठेतरी थांबले पाहिजे. ही आपली संस्कृती नाही. आपण इतके निर्दयी होऊच शकत नाही. ही बाब सर्वांनीच गांभीर्याने घेण्याची गरज

आहे. ज्या सैन्यामुळे आपण सुरक्षित आहोत, जे आपले रक्षाकवच आहे ते आपणच कुमकुवत कमजोर करू लागलो तर शत्रूला आपल्या पर्यंत पोचायला जास्त वेळ लागणार नाही.

आज सगळीकडे आरक्षणाचा मुद्दा गाजतो आहे. प्रत्येकाला आरक्षण पाहिजे त्यासाठी मोर्चे निघत आहेत. आरक्षण कसे असावे, कुणाला किती मिळावे, या राजकारणात मला पडायचे नाही. माझा मुद्दा असा आहे की आज सैन्यात भरती होण्यासाठी कुठलेही आरक्षण लागत नाही, अर्थात त्यात गैर काही नाही कारण आपल्या मातृभूमीची सेवा करायला आरक्षण कशाला पाहिजे ती मनातून येते, आणि देशाची एकात्मतेची भावना तिथे जपणे हेही त्यामागचे कारण असावे. पण माजी सैनिक, वीरपत्नी, वीर माता, शहीद जवानांची मुले यांच्यासाठी खास किंवा म्हणाव्या अशा कोणत्याही तरतुदी नाहीत आणि त्यासाठी कुणी पुढेही येत नाही. का? हा मुद्दा बऱ्याच लोकांना जरासा कडवट वाटेल पण हे बोलावे वाटते कारण परिस्थितीच तशी आहे. पण कुणाला हे समजत नाही की एकवेळ आरक्षण नसेल तरी चालेल पण

संरक्षण हवे. त्यासाठी आपल्या सैन्यदलाची काळजी घेणे गरजेचे आहे. आज सतत सीमेवर जवान शहीद होतायत, काही जखमी होतायत, आपण काय करतो? शहीदांचे फोटो चौकात लावतो श्रद्धांजली वाहतो आणि २ दिवसात परत सगळं पूर्ववत होत, पण याने खरंच त्यांना श्रद्धांजली मिळणार आहे का? फक्त फोटोला हार घालून सामाजिक जबाबदारी संपते का? याचा विचार सर्वांनी केला पाहिजे आणि यात मीपण आहे मी स्वतःला सर्वांपेक्षा वेगळं मानत नाही.

काही दिवसांपूर्वी शहीदांबद्दल एक लेख वाचला होता मी, त्यात असे म्हटले होते की कित्येक वीरांना “**शहीद**” हा दर्जाच भेटत नाही. त्यांना वीरमरण आल्यानंतर जे प्रमाणपत्र दिले जाते त्यावर “आकस्मिक निधन” असे लिहिलेले असते आणि त्यामुळे कित्येक शहीद कुटुंबाना शहीदांसाठीच्या कोणत्याच सुविधांचा लाभ मिळत नाही. यात किती तथ्य आहे मला माहीत नाही ते शोधण्याचा प्रयत्न मी करत आहे, पण जर खरंच असं असेल तर किती मोठी शोकांतिका आहे ही! जो वीर देशासाठी आपले प्राण देतो त्याला

साधा शहीद हा दर्जा मिळू नये, यापेक्षा मोठे दुर्दैव ते काय? माझ्या मते जो वीर स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता देशातील जनतेसाठी शत्रूवर तुटून पडतो स्वतःचे प्राण गमावतो तो शहीद असतो अशावेळी त्याला कोणत्याच फॉरमॅट मध्ये न बसवता त्याचे कर्तृत्व पाहून त्याला सन्मान द्यावा.

कुठल्याच वीराला आपल्या कार्यासाठी पुरस्कार किंवा सत्काराची अपेक्षा नसते. अपेक्षा असते ती फक्त सहकार्याची, त्यांचे मनोबल उंचावण्याची, कारण ते समाजहितासाठी इतकं करतात. आज त्यांचेही हित आपण जपले पाहिजे. कुठलेही युद्ध जिंकायचे असेल तर माणूस आधी मानाने कणखर असावं लागतो. बुद्धिवान असावा लागतो. शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ म्हणतात ते उगाच नाही. मग ते युद्ध सीमेवरचे असो किंवा आयुष्याचे. आपल्याला सुरक्षित राहायचे असेल तर सैन्य शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या मजबूत हवे. त्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. शारीरिकदृष्ट्या ते अजबूत आहेतच आणि मानसिक पण! तरीही आपण त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना आणखी प्रेरणा दिली पाहिजे.

जर आपले वीर जवान त्यांच्या रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत लढून देशसंरक्षणाचे वचन निभावतात तर आपणही आपले कर्तव्य जाणले पाहिजे. आपले वीर जवान आपल्या देशावर किती प्रेम करतात याची प्रचिती खालील वाक्यावरून येईल. ते म्हणतात,

**“I only regret that I have but only one life to give for my country.”**

म्हणजेच त्यांना म्हणायचंय की, त्यांना खंत वाटते की देशाला देण्यासाठी त्यांच्याकडे फक्त एकच जीवन आहे. अजुन संधी मिळाली असती तर अजुन देशासाठी लढले असते. यापेक्षा जास्त देशभक्तीबद्दल काय बोलावे!

*****************************************************

# प्रकरण ८

# भारतीय संस्कृती

भारतीय संस्कृती इतकी महान आहे की, आजकाल बाहेरच्या देशातील लोकही याचे अनुकरण करण्याचा मोह आवरू शकत नाहीत.

वृक्ष आणि प्राणिमात्रांना देव मानणारी संस्कृती आहे आपली! तसेच अखंड स्मरणात राहील असा थोर इतिहासही आपल्याला लाभला आहे. आपल्याला अन्यायाविरुद्ध लढण्याची शिकवण आपला इतिहास आपल्याला देतो. हा वारसा पुढे असाच जपण्याची गरज आहे. एक सुसंस्कृत आणि गुणवान पिढी घडवण्याचे काम आपल्याकडे आहे.

आधी काळ वेगळा होता, पण आताची पिढी पूर्ण डिजिटल होत चालली आहे. अर्थात त्याचे फायदे आहेतच पण योग्य प्रमाणात वापर केला तरच! आज कित्येक मुले ब्लू व्हेल, पब जी सारखे गेम्सच्या आहारी जाऊन कोवळ्या वयातच आपले आयुष्य संपवत आहेत.

कित्येक मुलांना मराठीचे शिक्षणच दिले जात नाही. ते पूर्णपणे इंग्लिश मेडीयम मध्ये शिकतात. बाहेर स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर इंग्रजी येत असणे आवश्यक आहे, याबद्दल कुठलेच दुमत नाही, पण याचबरोबर मुलांना आपला देश, आपली मातृभूमी, आपली भाषा याबद्दल प्रेम निर्माण व्हायला हवे. ते निर्माण नाही झाले तर आपली संस्कृती इतिहासजमा व्हायला वेळ लागणार नाही, याचा कुठेतरी विचार व्हावा असे मला वाटते.

आपण पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करतो आणि मुलांनाही तेच करू देतो. त्यामध्ये गैर काही नाही. त्यामुळे आपले राहणीमान सुधारत असेल, सौंदर्य खुलत असेल, तर ठीक, पण त्यामुळे आपण स्वतःला कुठंतरी गमावत असेल, एक आभासी आयुष्य जगात असेल जे आपण नाही, तर त्याचा काहीच उपयोग नाही.

आपण वेगवेगळे डेज साजरे करतो. पूर्ण कॅलेंडर डेज ने भरलेले असते. आज हा डे, उद्या तो डे. यातही काही गैर नाही. आनंद वाटल्याने वाढतो,

पण आपण आपली संस्कृती विसरता कामा नये. उदाहरणार्थ आपण “मदर्स डे” साजरा करतो तो आईला “हॅपी मदर्स डे” म्हणून, पण तिच्या पायांना स्पर्श करून तिचे दर्शनही घेतले पाहिजे. पाश्चात्य संस्कृती जोपासावी पण त्यात आपली संस्कृती लोप पाऊ नये याचीही काळजी घ्यावी. आपल्या संस्कृतीतल्या प्रत्येक गोष्टीला विज्ञानाचा आधार आहे काहीतरी कारण आहे.

आता नवीन वर्षाचेच उदाहरण घ्या. पाश्चात्य संस्कृतीत नवीन वर्ष १ जानेवारीला साजरे करतात. माझ्या माहितीप्रमाणे याला विज्ञानाचा कसलाच आधार नाही, फक्त इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे ३१ डिसेम्बरला वर्ष संपते म्हणून १ जानेवारीला नवीन वर्ष. त्यावेळी पानझडी होत असते. काही लोक मात्र ३१ डिसेम्बरला पार्ट्या करून १ जानेवारीला आळसात नवीन वर्ष साजरे करतात. आपल्या संस्कृतीत नवीन वर्ष गुढीपाडव्याला साजरे करतात. गुढीपाडवा मराठी दिनदर्शिकेप्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला म्हणजेच वसंत ऋतूच्या पहिल्या दिवसाला साजरा केला जातो. शालिवाहन संवत्सराचा हा पहिला दिवस आहे. या दिवशी नवीन वस्तू खरेदी, व्यवसाय

प्रारंभ, नव उपक्रमांचा प्रारंभ, सुवर्ण खरेदी इ. गोष्टी केल्या जातात. दारी उभारलेली गुढी हे विजय आणि समृद्धीचे प्रतीक आहे असे मानले जाते. गुढी पाडव्यापासूनच राम जन्मोत्सवाच्या कार्यक्रमाचासुद्धा प्रारंभ होतो. यादिवशी प्रातःकाळी कडुनिंबाची कोवळी पाने, हिंग, ओवा, चिंच या समवेत द्यावीत असा प्रघात आहे, कारण कडुनिंब औषधी आहेच पण रसांसमवेत (आंबट, तुरट, तिखट यासारखा) याचे सेवन आयुर्वेदात महत्त्वाचे मानले आहे. पचनक्रिया सुधारणे, पित्तनाश करणे, त्वचा रोग बरे करणे, धान्यातील कीड थांबवणे हे आणि असे अनेक औषधीगुण ह्या कडुलिंबाच्या अंगी आहेत, असे आयुर्वेदशास्त्रात मानले जाते. शरीराला थंडावा देणाऱ्या कडूनिंबाची पाने अंघोळीच्या पाण्यात घालणे, ती वाटून खाणे हे आरोग्याच्या दृष्टीने हितकारक समजले जाते. गुढीपाडव्याच्या सुमारास झाडांना नवीन पालवी फुटत असते. संपूर्ण निसर्गच जणू नववर्षाचे स्वागत करत असतो.

## उदाहरण दुसरे:

आपल्याकडे असा संस्कार आहे की घरातून निघताना किंवा मंगल प्रसंगी वडीलधाऱ्या, आपल्या पेक्षा मोठ्या माणसांचे दर्शन घ्यावे, तेही चरणस्पर्श करून. त्यामागे वैज्ञानिक कारण असे आहे की आपण जेव्हा दर्शन घायला खाली झुकतो तेव्हा मेंदूला रक्तपुरवठा चांगल्या प्रमाणात होतो. इतर वेळी तो कमी प्रमाणात होत असतो पण दर्शन घेताना झुकल्याने हा समतोल राखला जातो, तसेच चरणस्पर्श करून दर्शन घेतल्याने थोरा-मोठयांबद्दल मनात आदरभाव निर्माण होतो, पण आज सगळे हाय बाय वर येऊन थांबले आहे.

## उदाहरण तिसरे:

पूर्वी घरात सणवार असू दे किंवा रोजचे जेवण असू दे त्यानिमित्ताने घरातले सर्व एकत्र यायचे दिवसभरात काय केले याची चर्चा व्हायची, विचारांची देवाणघेवाण व्हायची पण आता हे कुठंतरी लोप पावत आहे.

आज एकाच घरात राहून एकाच कुटुंबातले सदस्य वेगवेगळे आयुष्य जगताना दिसतात.

वरील तिन्ही उदाहरणातून आपल्या लक्षात येईल की आपल्या संस्कृतीला विज्ञानाचा आधार आहे. प्रत्येक कृतीमागे काहीतरी कारण आहे, मग ते नैसर्गिक असो किंवा शरीराच्या दृष्टीने फायद्याचे, पण आज हे होताना दिसत नाही. मुलेही मैदानी खेळ विसरून मोबाइल मधले गेम्स खेळणे जास्त पसंत करतात. त्यांना लहानपणापासून इलेक्ट्रॉनिक वस्तूंची इतकी सवय होते की त्यांना त्या नाही मिळाल्या तर ते आत्महत्या सुद्धा करतात. मग मारून, रागवुन समजावण्याची तर अपेक्षाच नाही ठेवू शकत. मग नंतर मुलं ऐकत नाहीत अशी तक्रार करून काही फायदा नाही. मग अशी पिढी निर्माण झाली तर देशाचे, देशाच्या संस्कृतीचे आपल्या मुल्यांचे रक्षण कसे होणार? जर नवीन पिढीला देशाबद्दल आपुलकी प्रेम अभिमान नसेल तर काय भविष्य असेल देशाचे?

पण अगदीच सगळीकडे अशीच परिस्थिती आहे असा नाही. आजही भारताच्या कित्येक भागातील मुलं विविध प्रकल्प, नवनवीन शोध लावून भारताचे नाव पुर्ण जगात उज्वल करत आहेत. आज मिलिटरी साठी सुद्धा कितीतरी प्रकल्प मुलांनी केलेत, आणि करत आहेत जेणेकरून आपल्या सैन्याचा त्रास थोडा कमी व्हावा. कित्येक मुले शाळा कॉलेजेस मध्ये राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमातून सामाजिक कार्याचे महत्व समजून घेत आहेत. तसेच समाजहितासाठी वेगवेगळी कामे करत आहेत, म्हणून मला वाटतं की अगदीच निराशाजनक परिस्थिती आहे असं काही नाही. अजुनपण वेळ आहे. आपण आशावादी आहोत. मुलं म्हणजे मातीला गोळा. आकार द्यावा तसा ते आकार घेतो, आणि मनात आणलं तर काही अशक्य नाही. ज्या देशाच्या संस्कृतीत वाल्याचा वाल्मिकी होऊ शकतो तिथं या निरागस आणि निष्पाप बाळांना देशसंस्कृतीचे संस्कार देणे ही तर सहज शक्य गोष्ट आहे. रागापेक्षा प्रेमाने समजावून सांगितलं तर मुले निश्चितच ऐकतात.

आपला धर्म, आपली संस्कृती आणि आपली तत्वे जपण्यासाठी कितीतरी हालअपेष्टा सोसून बलिदान देणारे **धर्मवीर संभाजी राजे** यांसारखी बलिदानाच्या पराकाष्ठेची उदाहरणे आपल्याकडे आहेत, त्यामुळे आपण भावी पिढीला संस्कृती, तत्वे जपण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे.

देशाच्या सैन्याचाही मुलांना अभिमान हवा. आज काश्मीरमधील कित्येक तरुण मुले दहशतवादाकडे वळत आहेत भारतीय सेनेने काश्मीरमधील लोकांना तसे आवाहनही केले आहे की मुलांना असे करू देऊ नये नाहीतर हानी आपलीच होणार आहे.

दहशतवाद संपवायचा असेल तर आपणही एक पाऊल पुढे टाकले पाहिजे आणि आपण हे करू शकलो तर भारत पहिल्यासारखा किंवा त्यापेक्षा जास्त समृद्ध व्हायला वेळ लागणार नाही. मग ती समृद्धी फक्त धनाचीच नाही तर विचारांचीदेखील असेल.

थोर विचारवंतांनी संस्कृती आणि मुल्यांचे महत्व फार वर्षांपूर्वी जाणले होते म्हणून तर १९६५ मध्ये लाल बहादुरशास्त्रींनी **"जय जवान जय**

**किसान"** हा नारा दिला होता. हा नारा खूप महत्वपुर्ण आहे, कारण देशाच्या समृद्धीसाठी जवान आणि किसान दोन्ही महत्वाचे. पण दुर्दैवाने आज दोघांची पण परिस्थिती फारशी चांगली नाही. उलट ती दिवसेंदिवस खराब होत चालली आहे. जवान सीमेवर शहीद होत आहेत आणि शेतकरी अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत, आणि त्यांच्या आत्महत्यांचे प्रमाणही वाढत आहे. देश समृद्ध व्हायचा असेल तर हे दोघेही आधी मजबूत बनले पाहिजेत. या दोघांनाही समाजात खूप महत्वाचे स्थान आहे. एक जगवतो, धान्य पुरवतो तर दुसरा रक्षण करतो. त्यांना कुठंतरी मदतीचा हात दिला गेला पाहिजे. मला अशा आहे की या लिखाणाच्या निमित्ताने मी या परिस्थिती थोडातरी बदल करू शकेल आपण याही संकटावर मात करू शकतो.

भारतीय संस्कृतीत समाजाला खूप महत्व आहे. माझ्या आजूबाजूला दुःख असताना मी एकटे सुखी होऊ पाहणे म्हणजे भ्रम आहे. प्राणिमात्रांवर दया करा, कुणाच्या व्यंगावर हसु नका, आपल्यापेक्षा दुर्बल घटकांना मदत करा, विनाकारण कुणावर टीका करू नका, कुणावरही टीका करण्याआधी

आपण खरंच यासाठी पात्र आहोत का हे एकदा तपासून बघा आणि स्वतःला सिद्ध करायचं असेल तर ते दुसऱ्याला कमी न लेखता कसं करता येईल हे बघा. अशी शिकवण आपली संस्कृती देते. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नसून विकासाचा मार्ग आहे हे समजले पाहिजे.

आता एक मोठा प्रश्न हा आहे की देशाचा विकास कसा करावा? त्याचे उत्तर खूप सहज आणि सोपे आहे. आपण जे कोणते काम हातात घेऊ ते पूर्ण प्रामाणिकपणे आणि आवडीने केले पाहिजे तरच ते पूर्ण होईल नाहीतर ते नीट होणार नाही. त्यामुळे आपल्याला आपल्या देशाला प्रगतीपथावर न्यायचे असेल तर देशभक्ती किंवा देशसेवा आपल्याला आवडेल त्या मार्गाने करावी. एखादी जबाबदारी किंवा काम म्हणून त्या गोष्टीकडे पाहू नये. ज्याप्रमाणे जवानांना देशसंरक्षण करणे सन्मानाचे तर वाटतेच पण ते जबाबदारी पेक्षा जास्त आपलेपणा या भावनेनं देशसेवेकडे बघतात म्हणून तर प्रतिकूल परिस्थितीचाही सामना करण्याचे बळ त्यांना मिळते. आपलेही तसेच आहे. आपणही आपल्याला आवडेल त्या मार्गाने देशसेवा करू शकतो.

एखाद्याला ते लिखाणातून करावेसे वाटेल, कुणाला आपल्या अभिनयातुन, कुणाला आपल्या कलेतुन, कुणाला शिक्षणाच्या मार्गातुन, कुणी सामाजिक कार्यामधून, शेतकरी शेतात धान्य पिकवून करेल तर जवान सीमेवर राहून. विशेष म्हणजे सर्वांचा हेतू शुद्ध असतो त्यामुळे कोणतेच काम मोठे आणि छोटे असू शकत नाही आणि त्यांची तुलनाही होऊ शकत नाही. त्यामुळे आपल्या आवडीचे काम करावे. मन लावून करावे. ते छोटे की मोठे महत्वाचे नाही. हेतु शुद्ध हवा. जेव्हा आपण आपल्या आवडीने एखादी गोष्ट करतो तेव्हा तिचे पूर्णत्व तर सुंदर असतेच, पण ते पूर्णत्वास नेईपर्यंतचा प्रवास सुखकर होतो. मग त्या प्रवासात किती त्रास किती अडथळे आले तरी माणूस फक्त ध्येयाकडे लक्ष केंद्रित करतो. यावरून आपल्याला समजेल की एखादा वीर शहीद होतो तेव्हा त्याच्या मनात काय भावना असतील. त्यांचे विचार इतके थोर असतात की साधे मरण पत्करण्यापेक्षा तिरंग्यात लपेटून जाणे म्हणजे त्यांना त्यांच्या जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते. आपणही

आपल्या देशाला आपल्याकडून जमेल तेवढे कार्य करून आपल्या जीवनाचे सार्थक करू शकतो.

मी असे म्हणत नाही की देशसेवा करायची असेल तर सीमेवरच जाऊन उभे राहा. आपण आपल्याला जमेल तसे कार्य करा, जेणेकरून ते देशाच्या हितावह होईल. **ते कसे?** आपल्या आसपासच्या गरजू लोकांना जमेल तेवढा मदतीचा हात देण्याचा प्रयत्न करा. आपल्या मुलांना देशप्रेमाचे संस्कार द्या. एक व्यक्ती म्हणुन प्रामाणिकपणे वागा. आपली तत्वे, मुल्ये यावर ठाम राहण्याचा प्रयत्न करा. आज देशात भ्रष्टाचार इतका वाढत आहे तो थांबवण्यासाठी प्रयत्न करा. सुरवात स्वतःपासून करा. निदान मी स्वतः तरी माझे काम प्रामाणिकपणे करीन असे स्वतःला सांगा.

मी, माझे न म्हणता आपले ही भावना जपा आणि मुलांनाही शिकवा. नाहीतर विचार करा की आज एखादा जवान म्हणेल मीच सीमेवर का लढू मी फक्त माझ्या कुटुंबाचे रक्षण करतो, किंवा एखादा शेतकरी म्हणेल मी

माझ्या कुटुंबापुरतेच धान्य पिकवतो, किंवा एखादा शिक्षक म्हणेल मी माझ्या मुलाबाळांनाच फक्त शिक्षण देतो, किंवा एखादा सफाई कामगार म्हणेल मी फक्त माझेच घर स्वच्छ करतो तर चालेल का? आज या व्यक्ती आपापले काम समाजासाठी प्राणिकपणे आणि निरपेक्षपणे करत आहेत त्यामुळे राष्ट्र सुरक्षित आहे, सर्वांना खाण्यासाठी धान्य उपलब्ध आहे, सर्वांना शिक्षण मिळत आहे आणि सगळीकडे स्वच्छता आहे. सर्वांचेच कार्य तितकेच महत्वाचे असाच विचार प्रत्येकाने करायला हवा. आपली कला आपले कौशल्य याचा फायदा पूर्ण समाजाला झाला पाहिजे. आज मी भारतीय आहे तर मीही देशाचे काहीतरी देणे लागतो ही भावना जपली पाहिजे. पैसे तर सगळेच कमावतात पण मरतेसमयी तो सोबत येत नाही. जगतात सगळेचजण, पण कायम स्मरणात तेच राहतात ज्यांनी समाजहितासाठी काहीतरी केलेलं असते.

आता एका विहिरीचे उदाहरण घ्या. विहिरीत जेव्हा आपण मनसोक्त खेळतो, पोहतो तेव्हा ती गोष्ट आनंद देते. विहीरभर पाणी असते पण त्याचे

ओझे कधीच वाटत नाही. त्याच पाण्यातली एक घागर भरून डोक्यावर घ्या. काही वेळाने ओझे वाटायला लागेल. आपले आयुष्यही असेच आहे. कुठलेही काम समाजासाठी केले तर आनंद देते पण आपला स्वार्थ पहिला तर कालांतराने त्याचे ओझे वाटू लागते. पैसे कमावणे आवश्यक आहे नाही असा नाही. जीवनावश्यक वस्तूंसाठी पैसे हा हवाच. पण तो सरळ मार्गाने कमवावा कारण गैरमार्गाने किंवा कुणाला फसवून मिळवलेला पैसे कधीच समाधानाची झोप देत नाही.

देशसेवा करायची, सामाजिक कार्य करायचे म्हणजे अमाप पैसे खर्च करून काहीतरी मोठे करावे असा काही नाही. आपण छोट्या छोट्या गोष्टींमधूनही हे शक्य करू शकतो दैनंदिन जीवनातही हे सहज शक्य आहे.

**कसे?**

यासाठी दैनंदिन जीवनातलेच एक उदाहरण घ्या. आपण बाजारात भाजी आणायला नेहमी जातो. भाजी घेताना भाव विचारतो आणि

भाजीवाला जो भाव सांगेल त्या भावापेक्षा काहीतरी कमी दराने ती भाजी मागतो किंवा भाव जास्त आहे असा म्हणून त्यापेक्षा कमी किमतीत कुठे भाजी मिळेल हे शोधतो. मग मला सांगा, कितीही किमतीची वस्तू असेल तेवढ्या दरात कुठलीही हुज्जत न घालता ऑनलाईन, दुकानात किंवा मॉल मध्ये घेणारे आपण ५ ते १० रुपयांची भाजी घेताना इतका विचार करतो. पण तरीही कुठलाच कष्टकरी शेतकरी किंवा भाजीवाला तुमच्याशी वाईट वर्तन करणार नाही हेपण तितकेच खरे. त्यांच्याकडे पैशांची श्रीमंती नसेलही कदाचित पण मनाची श्रीमंती मात्र खूप असते. आज मला वाटतं फक्त भाजी हीच अशी वस्तू उरलीय की त्यात कसलीच भेसळ नसते, ती शुद्ध असते. मग भेसळ असलेले पदार्थ मागेल तेवढ्या किमतीत घायचे, तेही फक्त आकर्षक पॅकिंग बघुन, आणि कष्टाच्या शुद्ध भाजीला अशी हुज्जत घालायची हे कितपत योग्य आहे? आणि मी म्हणते म्हणून नाही पण स्वतः कधी तरी निरीक्षण करून बघाच. जे कष्टकरी शेतकरी असतात किंवा निरपेक्षपणे समाजहित करतात ना त्यांच्या चेहऱ्यावर वेगळीच चमक आणि समाधान

असते. ते कुठल्याच भ्रष्टाचार करणाऱ्या किंवा लोकांवर अन्याय करणाऱ्या लोकांच्या चेहऱ्यावर कधीच दिसणार नाही. मग अशा वेळी आपण भाजी मिळेल त्या किमतीत कसलीच हुज्जत न घालता घेतली तर बिघडले कुठे? कधीतरी त्यांच्याही कामाचे कौतुक करा. त्यांच्याशी प्रेमाने बोला. समाजाला त्यांची खूप गरज आहे अशी भावना त्यांच्या मनात रुजू द्या. असे केले तर मला नाही वाटत कुठल्या शेतकऱ्याला आत्महत्या करावीशी वाटेल. शेतकऱ्यांचे नैराश्य कमी झाले तर कदाचित त्यांच्या आत्महत्याही थांबू शकतील. इतकं आपण करू शकलो तरी किती मोठी गोष्ट आहे ही! ज्यांचे कार्य कृषिक्षेत्राशी निगडित आहे त्यांनी जमेल तेवढ्या नवनवीन योजना शेतकऱ्यांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न करावा कारण बराचसा शेतकरीवर्ग हा अशिक्षित आहे. त्यांना बऱ्याच योजनांची माहिती नसते. तसेच ज्यांना जमेल ते बांधव, समाज प्रबोधन करून सुधारित शेती कशी करावी याबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन करू शकतात. अशा पद्धतीने प्रत्येकाने आपल्या परीने प्रयत्न केला तर नक्कीच सगळं शक्य होईल.

माझ्या माहितीप्रमाणे आजच्या काळात शेतकरी हाच एकमेव असा व्यक्ती असेल ज्याला स्वतःच्या उत्पादनाची किंमत स्वतः ठरवण्याचा अधिकार नाही. आज तुम्ही कुठेही जा, कोणतीही गोष्ट घ्या, प्रत्येक गोष्टीची किंमत विक्रेता ठरवतो, पण शेतकऱ्याचे तसे होत नाही. वर्षभर काबाडकष्ट करून मेहनत घेऊन, प्रसंगी कर्ज काढून सुंदर धान्य पिकवायचे, समाजाला पुरवायचे, आणि जेव्हा ते विकण्याची वेळ येते, मोबदला घेण्याची वेळ येते तेव्हा माल कवडीमोल दराने विकला जातो. खर्चही निघत नाही मग नफा तर दुरच. मग निदान जेव्हा ते स्वतःचा माल स्वतः विकायला घेऊन येतात तेव्हा तरी त्यांना आपण थोडे मन मोठे करून त्यांच्या मालाची योग्य किंमत देऊच शकतो. हे कोणी एकट्याने केले तर होणार नाही पण सर्वांनी केले तर नक्कीच शक्य आहे, आणि आपण असे नाही वागू शकलो तर आपल्यात आणि त्यांची पिळवणूक करणाऱ्या समाजकंटकात काय फरक उरला?

आपल्याला मदत करायची इच्छा तर असते पण जेव्हा खरंच संधी मिळते तेव्हा अशी आपण घालवतो त्यामुळे बदल घडत नाही. बदल नुसता चर्चा करून घडणार नाही, त्यासाठी कृती करायला हवी. कित्येक शेतकरी मालाला भाव नसल्यामुळे माल रस्त्यावर फेकुन देतात. त्यामध्ये त्यांचा राग तर दिसतोच, पण निराशा किती असेल याचा विचार करा. जी गोष्ट घाम गाळुन वाढवलेली असते ती अशी फेकुन देताना काय यातना होत असतील त्यांच्या मनाला याचा कधी विचार केलाय का आपण?

एखाद्याचा जीव घेणे हा अक्षम्य अपराध आहे, पाप आहे. याउलट तुम्ही एखाद्या आयुष्याला कंटाळलेल्या, हताश झालेल्या, मरणाची इच्छा झालेल्या व्यक्तीला पुन्हा नव्याने जगण्याची उमेद देऊ शकलात, त्याचे मनोबल वाढवून त्याच्यात संघर्ष करून जगण्याची शक्ती त्याच्यात निर्माण करू शकलात, त्याला मरणापासून परावृत्त करू शकलात तर ते पुण्य किती मोठे असेल! ज्याप्रमाणे जवान सीमेवर राहून करोडो देशवासीयांच्या

प्राणाचे रक्षण करतात, त्याचप्रमाणे तुम्हीही एक प्राण वाचवलेला असेल आणि तुमची देशभक्ती सार्थ ठरेल!

शेतकरी असो किंवा जवान असो, त्यांना जर खात्री पटली की समाज आपल्या कामाचा आदर करतो, आपल्यावर प्रेम करतो तर किती बरे वाटेल त्यांना! किती सोपे आहे हे! सगळ्यांनी मिळून प्रयत्न केला तर सहज शक्य होईल. अजून एक मुद्दा सांगावासा वाटतो की मनोबल वाढवा पण सहानुभुती देऊ नका. सहानुभुती माणसाला दुर्बल बनवते. सहानुभुतीपेक्षा **"तुम्ही काहीही करू शकता"** हा विश्वास त्यांच्यात निर्माण करा.

आता या अश्या गोष्टी करायच्या असतील तर आपण खुप कणखर आणि तत्ववादी व्हायला हवे तरच हे शक्य आहे, कारण प्रत्येक गोष्टीला सकारात्मक आणि नकारात्मक या दोन्ही बाजू असतात. समाजहिताचा नकारात्मक भाग म्हणजे चांगले कार्य करताना येणाऱ्या अडचणी, विरोध किंवा टीका हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे. कोणतीही व्यक्ती चांगली, वेगळी किंवा समाजहिताची गोष्ट करू पाहत असेल तर त्याच्यावर टीका

विरोध हा ठरलेलाच असतो. हे आताच नाही तर पूर्वापार चालत आलेले आहे, पण आपण हेही लक्षात घेतले पाहिजे की ज्या लोकांनी टीका विरोध याकडे लक्ष न देता आपले काम अविरतपणे चालू ठेवले ते अमर झाले आणि त्यांचे कार्यही त्यांनी पूर्णत्वास नेले.

मी तर असे म्हणेन की प्रत्येक गोष्टीला विरोध हा झालाच पाहिजे, त्याच्यावर प्रश्न विचारले गेले पाहिजेत, त्यामुळेच तर ध्येय साध्य करण्याची इच्छा तीव्र होते. **"तुम्ही हे करू शकता"** असे कुणी म्हणाले तर तुम्ही नक्कीच ती गोष्ट करून दाखवाल, पण त्याहीपेक्षा कुणी असे म्हणाले की, **"तुम्ही हे करूच शकणार नाही किंवा तुम्हाला हे जमणारच नाही"**, तर त्यामुळे पडणारा प्रभाव किंचित जास्तच असेल, आणि समोरच्याला चूक सिद्ध करण्यासाठी आणि स्वतःचे सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी तुम्ही नक्कीच ते कार्य करून दाखवाल. म्हणून टीकेला किंवा विरोधाला नेहमीच सकारात्मक दृष्टिकोनातून बघा. अर्थात तुमचा हेतू शुद्ध असेल आणि मार्ग सरळ असेल तरच. असं केलं तरच तुम्हाला तुमचे काम करण्याची प्रेरणा मिळेल आणि

एक वेळ अशी येईल की तुम्ही तुमचे काम, लोकांकडून होणारी टीका आणि विरोध एन्जॉय कराल आणि तुमचे कार्य पूर्ण झाले की आपोआपच बोलणाऱ्याचे तोंड बंद होईल.

**"निंदकाचे घर असावे शेजारी"** याचा हाच तर अर्थ आहे. सगळेच तुमचे प्रशंसक बनले तर तुमच्यातल्या उणिवा तुम्हाला कधीच कळणार नाहीत, त्यामुळे आयुष्यात समतोल साधण्यासाठी विरोधक आणि प्रशंसक दोघांचीही गरज आहे. त्यामुळे यापुढे तुम्ही एखादे कुठलेही चांगले कार्य करत असाल आणि कुणी विरोध केला किंवा टीका केली तर निराश न होता जास्त जोमाने कामाला लागा. टीका झाली म्हणजे तर आपले काम पूर्ण होणारच असे समजा. स्वतःवर विश्वास ठेवा. टीकेला उत्तर द्या पण कृतीतून, कारण उत्तर नाही दिले तर ती तुमची दुर्बलता समजली जाईल. आवडेल तेच करा. ज्या कामात तेज उत्साह आवड नाही असे काम केले तर वेळही वाया जाईल आणि आपल्यासोबत समाजाचेही नुकसान होईल. आवडीचे काम कधीच थकवा देत नाही आणि आवडीच्या कामाचा कधीच

कंटाळा येत नाही, ते देते ते फक्त आनंद आणि समाधान. असे होईल तेव्हा खोटे बोलणे, कुणाची फसवणूक करणे हा विचारही मनात येणार नाही, कारण अशा गोष्टी मनात तेव्हाच येतात जेव्हा माणूस आतून आनंदी समाधानी नसतो.

****************************************************

# प्रकरण ९

# जागृती

आतापर्यंत मांडण्यात आलेली मते ही माझी वैयक्तिक मते आहेत, परंतु हे सर्वांसाठी आहे त्यामुळे समाजाची मते जाणून घेणेही आवश्यक होते. त्यासाठी मी एक प्रश्नावली तयार केली आणि समाजाची मते त्यावर घेतली. प्रश्नावली खालीलप्रमाणे:

१) "आज आपले काही चुकले तर नाही ना", असे चिंतन तुम्ही दिवसातून एकदा कधी करता का?

२) तुमच्यासमोर एखादी चूक घडत असेल तर तुम्ही ते थांबवण्याचा प्रयत्न करता का चुकीला प्रोत्साहन देता?

3) तुमच्यासमोर एखादी व्यक्ती चूक करत असेल तर तिला सुधारण्याचा तुम्ही कधी प्रयत्न केला आहे का?

४) तुम्ही कधी एखाद्या मोठी चूक केलेल्या व्यक्तीला सुधारण्याची संधी दिली आहे का?

५) "तुम्ही एखादे चांगले काम हातात घेतले आणि त्याच्यावर टीका किंवा विरोध झाला म्हणुन ते सोडुन दिले", असे कधी झाले आहे का?

६) तुम्ही कधी एखाद्या चांगल्या कामाला स्वतःहुन मदत केली आहे का?

७) तुम्ही कधी समाजासाठी एखादे काम केले आहे का? नसेल केले तर करण्याची इच्छा आहे का?

८) एका दिवसात किती वेळा खोटे बोलता किंवा वागता असे वाटते? आणि वाटत असेल तर ते कमी व्हावे असा प्रयत्न कधी केलाय का?

९) आपल्या पुढच्या पिढीसाठी इंग्लिश माध्यम असावे वाटते की मराठी?

१०) शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी काय करायला हवे असे तुम्हाला वाटते?

हे प्रश्न आधी मी स्वतःलाच विचारले आणि नंतर समाजातील व्यक्तींना.

जेव्हा वरील प्रश्न मी सुजाण नागरिकांना विचारले तेव्हा प्रतिसाद संमिश्र होता आणि काहीसा धक्कादायक सुद्धा! काही लोकांनी प्रश्नांची थट्टा केली, बऱ्याच लोकांनी प्रामाणिकपणे उत्तरेही दिली, काहींनी तेच प्रश्न मलाच विचारले, काहींनी समाजकार्याचा मार्ग देखील दाखवला, तर काहींना मी फिलॉसॉफर होते की काय असे वाटले. कितीतरी लोकांनी

माझ्या प्रश्नांवर खूप छान उपाय सुचवले. बऱ्याच लोकांच्या प्रतिक्रिया संमिश्र आल्या, पण समाधान याचे वाटते की, जास्तीत जास्त व्यक्ती आणि विद्यार्थी यांचा प्रतिसाद सकारात्मक वाटला. जसं मी आधी सांगितलं त्याप्रमाणे कोणतेही कार्य करताना टीका ठरलेली असते आणि तेच काही अंशी अनुभवायला मिळाले. पण समाधान याचे आहे की प्रोत्साहनही खुप मिळाले.

हेच प्रश्न मी माझ्या विद्यार्थ्यांना देखील विचारले. खरंतर मला विचारताना काळजी वाटत होती, कारण विद्यार्थी म्हणजे देशाचे भविष्य! त्यांनी जर नकारात्मक उत्तरे दिली असती तर खरंच परिस्थिती गंभीर असली असती, पण तशी वेळ सुदैवाने आली नाही. मुलांनी खरंच त्यांच्या बालबुद्धीप्रमाणे प्रामाणिक उत्तरे दिली आणि सकारात्मक सुद्धा ! मला खूप कौतुक वाटले की, भारताचे भविष्य प्रामाणिकपणाला धरून आहे.

मला आता पूर्ण विश्वास आहे की, नकारात्मक मानसिकताही नक्कीच बदलेल. कमीत कमी या प्रश्नावलीच्या निमित्ताने तरी मी काही अंशी समाजातील घटकांना मनन, चिंतन करायला लावले. ही एका दिवसात होणारी गोष्ट नाही वेळ लागेल पण बदलही घडेल. फक्त **“शिवाजी जन्माला यावा पण शेजारच्या घरात”**, ही मानसिकता बदलली पाहिजे, तसेच तुम्ही एखादे काम करत असाल तर ते आत्मविश्वासाने केले पाहिजे आणि आपल्या मतांवर ठाम राहिले पाहिजे. नाहीतर **"लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण मात्र कोरडा पाषाण”** अशी स्थिती होऊन जाईल, त्यामुळे आतापर्यंत समाजहिताच्या ज्या काही गोष्टी मी सांगितल्या आहेत त्या आचरणात आणण्याचा प्रयत्न मी नेहमीच करते आणि करत राहणार. माझ्या प्रयत्नांना समाजाचेही सहकार्य मिळावे हीच अपेक्षा आहे.

*****************************************************

# प्रकरण १०

## सारांश

१४ फेब्रुवारीला पुलवामा, काश्मीर येथे दहशतवादी हल्ला झाला. पुर्ण देश हळहळला. त्यानंतर कितीतरी दहशतवाद्यांना कंठस्नान घालून भारतीय सेना आपले काम चोख बजावत आहे. सीमेवर रोज कोणी ना कोणी शहीद किंवा जखमी झाल्याच्या बातम्या येत असतात. कित्येक शहीदांचे परिवार मनाने खचत आहेत. त्यांची आबाळ होत आहे. जवान शहीद झाल्यावर त्यांना श्रद्धांजली दिली जाते पण त्यानंतर त्यांच्या परिवाराची काय परिस्थिती आहे त्यांना कसल्या मदतीची गरज आहे का? हे पाहायला कोणीही जात नाही. जेव्हा एखाद्या कुटुंबातला कर्ता माणुस जात असेल तेव्हा त्या कुटुंबाचे काय होत असेल? त्यांच्या परिवारांची काळजी घेणे, त्यांना मान सन्मान देणे, धीर देणे हे आपले कर्तव्य आहे.

शेतकऱ्यांच्या बाबतीतही तसेच होत आहे. जगाचा पोशिंदा, अन्नदाता म्हणवला जाणारा शेतकरी नैराश्य, कर्जबाजारीपणा, ताणतणाव यामुळे

आत्महत्या करत आहे. त्यांचाही विचार आपण केला पाहिजे. कर्जमाफी, वीजबीलमाफी, पिकांना हमीभाव, विविध योजना या राजकीय पातळीवरच्या गोष्टी कधी ना कधी होतीलच, आणि त्या साध्य करायच्या असतील तर कोणत्याही अमिषाला बळी न पडता प्रामाणिकपणे आणि जागरूकपणे मतदान करून योग्य उमेदवार निवडुन देणे गरजचे आहे, आणि दुसरे कोणीतरी येऊन आपली अडचण सोडवेपर्यंत आपण वाट पाहणार आहोत का? एक समाज म्हणून आपणही बरंच काही करू शकतो ते करायला नको का?

सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे **"हे करायला हवे, ही मानसिकता बदलायला हवी, हे करू नका"**, हे सगळे उपदेश नसून माझी नम्र विनंती समजावी. कोणाला उपदेश करावा इतकी मोठी मी नाही. या पुस्तकात ज्या गोष्टी सांगितलेल्या आहेत त्याचा विचार काही जणांनी यापूर्वीही केला असेल, काहींनी नसेल केला, काहींनी विचार केला असेल आणि कृतीही केली असेल. आता काही लोक असाही विचारतील की आम्हाला सांगत आहेत तुम्ही काय केले? तर मला हेच सांगावेसे वाटते की जागृती ही एका दिवसात

होणारी गोष्ट नाही. मला स्वतःला पण या गोष्टींची जाणीव व्हायला खूप वेळ लागला किंबहुना उशीरच झाला आहे, नाहीतर या गोष्टी खूप आधी लिहिल्या गेल्या असत्या पण म्हणतात ना, **“जब जागो तब सवेरा”**. तसेच मीही गेल्या कित्येक दिवसांपासून या गोष्टी आचरणात आणायला चालू केल्या आहेत हे पुस्तक त्यापैकीच एक. मी माझ्या लिखाणातुन शहीद परिवाराचे, शेतकऱ्यांचे आणि जे परिस्थितीमुळे खचले आहेत अशा घटकांचे मनोबल वाढवण्याचा प्रयत्न करीत आहे. अर्थातच माझा हेतू शुद्ध आणि पवित्र आहे त्यामुळे मला यश नक्की मिळेल असा मला विश्वास आहे, आणि असाच प्रयत्न सर्वांनी करावा ही विनंती.

मला कित्येक लोक असेही भेटले की, ज्यांना समाजकार्य करण्याची किंवा लोकांची मदत करण्याची इच्छा असते पण नक्की काय करायचे हेच त्यांना माहित नसते. कित्येक लोक प्रामाणिकपणे आपले काम करत आहेत. सांगायचं हेतू हाच की आजही आपल्या देशाने आपली तत्वे, संस्कार आणि मूल्ये जपलेली आहेत असे मला दिसून आले. काहीच थोडे लोक जे अस्थिरता

पसरवतात किंवा असंस्कृतपणे वागतात त्यामुळे पूर्ण देशाचे नुकसान होऊ नये असे मला वाटते. त्यामुळे आता **"देशसेवा, समाजकार्य करायचे म्हणजे नक्की काय करावे?"** याचे उत्तर मी माझ्या बुद्धिमत्तेनुसार देऊ शकले असे मला वाटते. मीपण या देशाचा मूलभूत घटक आहे त्यामुळे मीही स्वतःला समाजापेक्षा वेगळं मानत नाही. मी माझे प्रयत्न असेच कायम चालु ठेवणार आहे.

बऱ्याच गोष्टी, बरेच मुद्दे अजूनही राहून गेले आहेत. पण तेही लवकरच मी वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न करेन. सगळयात महत्वाचे म्हणजे अजूनही कितीतरी शहीद जवानांची नावे, त्यांचे कार्य आपल्यापर्यंत पोचलेलेच नाही. आतापर्यंत देशहितासाठी ज्यांनी आपले प्राण गमावले आहेत अशा जवानांचा आम्हाला खूप खुप अभिमान आहे हेच इथे मला सांगावेसे वाटते.

या लिखाणाचे सार्थक तेव्हाच होईल जेव्हा याचा परिणाम दिसून येईल. या लिखाणाचा हेतु कुणावरही टीका करण्याचा किंवा कुणाचे मन

दुखावण्याचा मुळीच नाही. त्यामुळे कळत नकळत कुणाचे मन दुखावले गेले असेल तर त्याबद्दल क्षमस्व.

भारतीय जनता सर्व वीर जवान, त्यांचे परिवार तसेच जगाचा पोशिंदा शेतकरी या दोघांच्याही मागे खंबीरपणे उभी राहील आणि त्यामुळे सेनेच्या शौर्यात आणि देशाच्या समृद्धीत आणखीनच भर पडेल हीच सदिच्छा. भारत निरंतर असाच प्रगतीपथावर वाटचाल करत राहो, सर्वांना प्रेरणा मिळत राहो तसेच सर्व जनतेला सुख शांती आणि समृद्धी लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!!

**जय हिंद !!**

*****************************************************


अमर
जवान
अमर
जवान

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. भाग्यश्री पाटील यांचं हे दुसरं पुस्तक.** प्रकाशक मिळत नसल्यामुळे भाग्यश्री पाटील यांच्यासारखे काही प्रतिभावान लेखक प्रसिद्धीपासून दूर असतात. भाग्यश्री पाटील यांचे लेखन सामाजिक जागृतीसाठी आहे. आणि त्याला व्यापक प्रसिद्धी मिळायला हवी. असे अतिशय चांगले तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस

वाढवत नेतात. प्रफुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणुक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान